रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

# कृषीवल

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड सोमवार । दि. २७ जुलै २०२६ । अंक ५१ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in

## राज्यात पावसाचा जोर वाढणार

**मुंबई :** बंगालच्या उपसागरात निर्माण झालेल्या हवामान प्रणालीमुळे महाराष्ट्रात पुन्हा पावसाचा जोर वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या २४ तासांत कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची नोंद झाली. येत्या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्यावर काही ठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. तसेच विदर्भ आणि मराठवाड्यात काही भागांत वादळी वाऱ्यासह विजांच्या कडकडाटात पाऊस होण्याचा अंदाज आहे.

## मंत्री तटकरेंचे महिलांविषयी वादग्रस्त विधान

**वाशिम :** लाडकी बहीण योजनेच्या आर्थिक मदतीवरून महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी केलेल्या वक्तव्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. ''आम्ही पैसे दिले की महिला शॉपिंगसाठी बाजारात गर्दी करतात; महिलांपेक्षा व्यापारीच आम्हाला पैसे कधी टाकणार, असे विचारतात,'' असे वक्तव्य तटकरे यांनी केले. वाशिम येथील महिला व बालविकास विभागाच्या अहिल्या भवन लोकार्पण सोहळ्यानिमित्त रविवारी आयोजित संवाद कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या विधानामुळे संताप व्यक्त करण्यात येत आहे.




# शिवतीर्थावर विजयाचा जल्लोष

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

**नीट पेपरफुटीप्रकरणी शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्यासाठी दिल्ली, मुंबई-महाराष्ट्रासह देशभरात तब्बल २६ दिवस पेटलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाच्या वणव्यानंतर अखेर प्रधान यांनी राजीनामा दिला. तरुणाईच्या बुलंद आवाजाला न्याय मिळाला. या विजयाचा जल्लोष करण्यासाठी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर रविवारी (दि. २६) अभिनंदन सभेचे आयोजन करण्यात आले होते. वंदे मातरम्.. भारत माता की जय... छत्रपती शिवाजी महाराज की जय.. जय भवानी, जय शिवाजी... अशा गगनभेदी घोषणा देत शिवतीर्थावर चोहोबाजूने तरुणाईचा महापूर लोटला होता. हातात तिरंगा, सरकारविरोधातील पोस्टर घेऊन हजारोंच्या संख्येने जमलेल्या तरुणाईने यावेळी विजयाचा जल्लोष साजरा केला.**




विद्यार्थ्यांच्या आंदोलनासमोर केंद्र सरकारलाही झुकावे लागले आणि केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा लागला. याच पार्श्वभूमीवर मुंबईत ठाकरे बंधूंची जल्लोष •> पान २ वर

### अंधभक्तांविरोधात देशभक्त जिंकले!

अंधभक्तांविरोधात देशभक्त जिंकले आहेत. आता भाजप विरुद्ध भारत अशा संघर्षाची सुरुवात झालीय, असा एल्गार शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी केला. ते म्हणाले, एका झुरळाने हुकुमशहाला नमवलं आहे. हा खरा विष्णूचा अवतार आहे. मला मोदीजींना सांगायचे आहे की, आतातरी देशाकडे लक्ष द्या. तुमचे मंत्री काम सोडून पक्ष फोडण्यात बिझी आहेत. त्यांना सांगा की, आता देशाचं काम करा. अर्थमंत्री निर्मलाबाई घसरत्या रुपयाबद्दल, महागाईबद्दल बोलत नाही; पण पेपर फुटीचे फायदे समजावून सांगतायत. संरक्षण मंत्री राजनाथ सिंग देशाच्या संरक्षणाची बोंब पण धर्मेंद्र प्रधानच्या संरक्षणासाठी पुढे आलेले. आपले रस्ता मंत्री इथेनॉलवर बोलतायत. मोदींना मला सांगायचं आहे की, तुम्हाला तुमच्या लाडक्या धर्मेंद्रला मंत्रिमंडळातून काढताना किती यातना झाल्या त्याहून कितीतरी जास्त यातना आपण ज्यांना श्रद्धांजली वाहिली त्या मुलांच्या कुटुंबियांना झाल्या आहेत. त्या यातना आम्ही विसरणार नाहीत. ही ठिणगी आता पडली आहे. देशभर वणवा पेटलाय, असा इशारा उद्धव ठाकरे यांनी दिला आहे. मोदींनी पाहिलंय आता की, मत चोरी करता येते; पण माणसं चोरी •> पान २ वर

### तरुणांच्या ताकदीने सरकारच्या झिंज्या उपटल्या!



नीट पेपरफुटीविरोधात तरुणांनी देशभर पेटवलेल्या आंदोलनाला अखेर यश आले. या लढ्याने तरुणांची ताकद काय असते, हे केंद्र सरकारला दाखवून दिले. 'जेन झी' सरकारच्या झिंज्या कशा उपटतात, हे या आंदोलनातून देशाला कळले. सत्तेच्या जोरावर तरुणांचा आवाज दाबता येत नाही, हे विद्यार्थ्यांनी आपल्या लढ्याने सिद्ध केले आहे. महिनाभर रस्त्यावर उतरून, लाठ्याकाठ्या सहन करूनही आंदोलन सुरू ठेवणाऱ्या या तरुणांच्या संघर्षाचा हा विजय आहे. या विजयाचा उत्साह साजरा करण्यासाठी आज हजारो तरुण शिवाजी पार्कवर एकत्र आले आहेत. हा केवळ एका मंत्र्याच्या राजीनाम्याचा •> पान २ वर

# रायगड जिल्हा परिषद अध्यक्षांचे तुघलकी फर्मान?



■ **प्रसारमाध्यमांना माहिती देताना पूर्वपरवानगी बंधनकारक**

■ **अधिकारी, पदाधिकाऱ्यांची आदेशाने होणार गळचेपी**

**। रायगड । प्रतिनिधी ।**

प्रसारमाध्यमांना माहिती देण्यापूर्वी अध्यक्षांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक आहे, या रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी काढलेल्या तुघलकी फर्मानाची चर्चा रायगड जिल्हा परिषदेचे अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांमध्ये रंगलेली दिसली. जिल्हा परिषदेमध्ये तीन राजकीय पक्षांची एकत्रित सत्ता असताना कोणत्याही प्रकारचा विचारविनिमय न करता अध्यक्षांनी काढलेल्या आदेशाने पदाधिकाऱ्यांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर घाला घातल्याचे बोलले जात आहे. या आदेशामुळे पदाधिकाऱ्यांची गळचेपी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

अध्यक्षांनी काढलेल्या फर्मानावर रायगड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनीदेखील विभागाच्या प्रमुखांना सूचनांचे पालन करण्याचे आदेश काढले आहेत. जिल्हा परिषदेचे धोरणात्मक निर्णय, महत्त्वाच्या योजना किंवा •> पान २ वर

> शासनाच्या अनेक योजना साकारत असताना रायगड जिल्हा पुढे गेला पाहिजे यासाठी रायगड जिल्हा परिषद काम करीत आहे. या योजनांची काटेकोरपणे अंमलबजावणी रायगड जिल्हा परिषदेच्या अधिकाऱ्यांनी केली पाहिजे. देशाचा चौथा आधारस्तंभ असणाऱ्या प्रसारमाध्यमांमधून रायगड जिल्हा परिषदेचे काम जनतेपर्यंत पोहोचविताना योग्य ती माहिती अधिकाऱ्यांनी पत्रकारांना दिली पाहिजे, हाच या मागचा उद्देश आहे.
>
> – मंगेश वाकडीकर
> अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद

## 'विद्यार्थ्यांवरील लाठीचार्जचा आदेश कुणी दिला?'

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

पेपरफुटीविरोधात दिल्लीमध्ये शांततापूर्ण आंदोलन करणाऱ्या विद्यार्थ्यांवर झालेल्या लाठीचार्ज, पॅलेट गन आणि अश्रुधुराच्या वापरावरून लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्र लिहून थेट सवाल केला आहे. विद्यार्थ्यांवर पॅलेट गन आणि लाठीचार्ज करण्याची मंजुरी तुम्ही दिली होती का? नसेल, तर हा आदेश नेमका कुणी दिला? असा प्रश्न राहुल गांधी यांनी उपस्थित केला. या कारवाईत अनेक विद्यार्थी जखमी झाल्याचा दावा करत राहुल गांधी यांनी १९ वर्षीय साहिल लोचब याचाही उल्लेख केला आहे. पॅलेट गनच्या गोळीबारामुळे त्याला डोळा गमावण्याचा धोका असल्याचे त्यांनी पत्रात म्हटले आहे. पेपर फुटी थांबवावी आणि विद्यार्थ्यांच्या चांगल्या भविष्यासाठी मागणी करणे हा त्यांचा गुन्हा आहे का? असा सवालही त्यांनी केला. विशेष म्हणजे, आंदोलनादरम्यान साध्या वेशातील व्यक्ती विद्यार्थ्यांना लाठ्यांनी मारहाण करताना दिसल्या. हे लोक पोलीस कर्मचारी होते की स्वयंसेवक? असा प्रश्नही त्यांनी विचारला आहे.

# आजपासून 'महसूल'चे कामबंद आंदोलन



**कर्मचाऱ्यांवरील पोलीस कारवाईविरोधात संघटना आक्रमक; जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन**

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

शासकीय कर्तव्य बजावत असताना महसूल अधिकाऱ्यांवर थेट फौजदारी गुन्हे दाखल करून अटक करण्याच्या प्रकाराला विरोध करत रायगड जिल्ह्यातील महसूल कर्मचारी सोमवारी, दि. २७ जुलैपासून बेमुदत कामबंद आंदोलनाच्या पवित्र्यात उतरले आहेत. पोयनाड पोलीस ठाण्यात दाखल करून केलेल्या पोलीस कारवाईचा निषेध करत महसूल कर्मचारीसंघटनेनेजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने हस्तक्षेपाची मागणी केली आहे.

या गुन्ह्यात मंडळ अधिकारी रविदास सदुसिंग जाधव (चरी) आणि ग्राम महसूल अधिकारी सतीश भानुदास ढवळे (शहापूर) यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यापैकी रविदास जाधव यांना कोणतीही पूर्वकल्पना न देता थेट अटक करण्यात आल्याचा दावा संघटनेने केला आहे. पोलिसांची ही कारवाई एकतर्फी असून, महसूल कर्मचाऱ्यांवर दबाव आणण्याचा प्रकार असल्याचा आरोप संघटनेने केला आहे.

महसूल अधिकाऱ्यांचे संबंधित कामकाज हे महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ अंतर्गत त्यांच्या शासकीय कर्तव्याचा भाग असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. शासकीय कर्मचाऱ्याकडून कामकाजात चूक अथवा हलगर्जीपणा •> पान २ वर

## १२ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

पनवेलजवळील आसुडगाव येथे एक अत्यंत दुर्दैवी आणि काळजाचा ठोका चुकवणारी घटना घडली आहे. येथील गावदेवी मंदिरासमोरील एका इमारतीचे बांधकाम सुरू असलेल्या ठिकाणी खोदलेल्या आणि पाण्याने गच्च भरलेल्या उघड्या खड्ड्यात पडल्यामुळे एका १२ वर्षीय बालकाचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण आसुडगाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, स्थानिक नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

आसुडगाव येथील गावदेवी मंदिरासमोरील मोकळ्या जागेत इमारतीचे बांधकाम सुरू आहे. सुरक्षेसाठी या बांधकामाच्या बाजूने पत्रे मारण्यात आले होते, परंतु तिथे बांधकामासाठी खोदलेला मोठा खड्डा उघडाच होता, ज्यामध्ये पावसाचे पाणी साचून तळ्यासारखे स्वरूप आले होते. पीयुष हा १२ वर्षीय मुलगा या ठिकाणी अचानक पाण्यात पडला आणि बुडू लागला. मुलगा पाण्यात पडल्याची माहिती मिळताच परिसरात एकच खळबळ •> पान २ वर




**रुग्णांची खासगी रुग्णालयांकडे हकालपट्टी** | **आदिवासी गर्भवतीची प्रसूतीसाठी फरफट**

# कर्जत-कशेळे रुग्णालयात 'उपचार' मिळेनात!

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

लाखो-कोट्यवधी रुपये खर्च करून उभारलेल्या सरकारी रुग्णालयांत सर्वसामान्यांना वेळेत उपचार मिळत नसल्याच्या तक्रारी वाढत असतानाच कर्जत उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. प्रसूती वेदना सुरू झालेल्या आदिवासी गर्भवतीला आधी कशेळे ग्रामीण रुग्णालयातून कर्जतला पाठविण्यात आले; मात्र येथेही उपचाराऐवजी खासगी रुग्णालयाचा पर्याय सुचविण्यात आला. त्यात भर म्हणजे पुढील उपचारासाठी जाण्यासाठी रुग्णवाहिकेसाठीही प्रतीक्षा करण्याची वेळ आल्याने गरीब कुटुंबाची अक्षरशः फरफट झाली.




**रुग्णवाहिकेसाठीही प्रतीक्षा; तज्ज्ञ डॉक्टरांअभावी सरकारी आरोग्यसेवेचा बोजवारा**

कर्जत तालुक्यातील मोगरज ग्रामपंचायत हद्दीतील धामणी येथील नेत्रा भला या गर्भवती महिलेला प्रसूती वेदना सुरू झाल्यानंतर कशेळे ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रसूतीमध्ये अडचणी येण्याची शक्यता असल्याचे सांगत त्यांना कर्जत उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. कर्जत येथे आल्यानंतरही अपेक्षित उपचार न मिळाल्याने पुढे खासगी रुग्णालयात जाण्याचा पर्याय सुचविण्यात आल्याचे कुटुंबियांचे म्हणणे आहे.

आदिवासी आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबाला खासगी रुग्णालयातील प्रसूतीचा किमान ५० हजार रुपयांचा खर्च परवडणारा नसल्याने कुटुंबीयांची मोठी धावपळ उडाली. गंभीर परिस्थितीत रुग्णाला पुढील उपचारासाठी हलविण्याची वेळ आली; मात्र त्यासाठीही रुग्णवाहिकेची प्रतीक्षा करावी लागल्याने आरोग्य व्यवस्थेच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

कर्जत तालुक्यात मोठ्या संख्येने ग्रामीण आणि •> पान २ वर

### उपचाराअभावी हाल

दरम्यान, येत्या काही दिवसांत कर्जत उपजिल्हा रुग्णालयात प्रसूतीतज्ज्ञ आणि भूलतज्ज्ञांची नियुक्ती करण्यात येईल, असे प्रभारी वैद्यकीय अधिकारी डॉ. अडकमोल यांनी सांगितले आहे. त्यामुळे तज्ज्ञ डॉक्टरांच्या नियुक्तीनंतर तरी कर्जत-कशेळे परिसरातील गोरगरीब आणि आदिवासी रुग्णांना वेळेत आणि योग्य उपचार मिळणार का, याकडे आता नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# आराठी ग्रामपंचायतीचा कारभार कचऱ्याच्या ढिगाऱ्यात!

## || नागरी सुविधांचा बोजवारा || नागरिकांचे आरोग्य धोक्यात, प्रशासनाचे दुर्लक्ष

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन शहराला लागूनच असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीत ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. वाढत्या नागरीकरणामुळे या परिसरात मोठ्या प्रमाणावर निवासी इमारती उभ्या राहात असताना त्याप्रमाणात मूलभूत नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यात ग्रामपंचायतीला अपयश येत असल्याची नाराजी नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



आराठी ग्रामपंचायत हद्दीत गेल्या काही वर्षांत मोठ्या प्रमाणावर निवासी इमारती उभ्या राहिल्या असून, हजारो नागरिक या परिसरात वास्तव्यास आले आहेत. मात्र वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत पाणीपुरवठा, स्वच्छता, पथदिवे आणि कचरा व्यवस्थापनाची पुरेशी व्यवस्था आहे का, याचा विचार बांधकामांना परवानगी देताना करण्यात आला का, असा सवाल आता उपस्थित होत आहे.

श्रीवर्धन-म्हसळा-गोरेगाव हा प्रमुख मार्ग आराठी ग्रामपंचायत हद्दीतून जातो. या मार्गालगत नव्या इमारतींची बांधकामे झाली असून, काही ठिकाणी रस्त्यापासून अत्यल्प अंतरावर बांधकामे करण्यात आल्याचे चित्र आहे. श्रीवर्धन-दिघी मार्गावरील आराठी ग्रामपंचायत हद्दीतही मोठ्या प्रमाणावर बांधकामे झाली आहेत. त्यामुळे भविष्यात वाढणाऱ्या लोकसंख्येचा पाणीपुरवठा आणि इतर नागरी सुविधांवर होणारा ताण लक्षात घेऊन नियोजन करणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

दरम्यान, आराठी परिसरातील विविध भागांत ओला-सुका कचरा, प्लास्टिकच्या पिशव्या, रिकाम्या बाटल्या आणि इतर कचरा उघड्यावर टाकण्यात येत असल्याने सर्वत्र अस्वच्छतेचे चित्र दिसून येत आहे. कचऱ्याची नियमित विल्हेवाट लावली जात नसल्याने दुर्गंधी तसेच डास आणि रोगराईचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

आराठी ग्रामपंचायत हद्दीत श्रीवर्धन बसस्थानक परिसरापासून मेटकर्णी, आराठी, विद्यानगर आदी भागांचा समावेश होतो. या परिसरात वाढत्या नागरीकरणाबरोबरच विविध ठिकाणी दुकानगाळे उभारून ते भाड्याने देण्याचे प्रकारही सुरू असल्याची नागरिकांची तक्रार आहे. याबाबत संबंधित जागांची मालकी, बांधकाम परवानग्या आणि नियमांचे पालन याची प्रशासनाने तपासणी करावी, अशी मागणी होत आहे.

वाढत्या नागरीकरणाच्या पार्श्वभूमीवर आराठी ग्रामपंचायतीचा कारभार आणि बांधकामांना देण्यात आलेल्या परवानग्यांची चौकशी करावी, तसेच कचरा व्यवस्थापन आणि नागरिकांना आवश्यक नागरी सुविधा तातडीने उपलब्ध करून द्याव्यात, अशी मागणी नागरिकांमधून होत आहे. श्रीवर्धन तहसीलदार कार्यालय आणि पंचायत समिती प्रशासन या गंभीर प्रश्नाकडे गांभीर्याने लक्ष देणार का, असा सवालही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

# खोपटे येथे मत्स्यशेती प्रशिक्षण, मत्स्यबीज वाटप

## घाईघाईत कार्यक्रम उरकल्याने शेतकरी, लोकप्रतिनिधी नाराज

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त आणि माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या जयंतीनिमित्त रायगड जिल्हा परिषद कृषी विभागाच्या वतीने खोपटे प्राथमिक शाळेत मत्स्यशेती करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी प्रशिक्षण व मत्स्यबीज वाटप कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी उरण तालुक्यातील सुमारे ३०० शेतकऱ्यांना मत्स्यबीजाचे वाटप करण्यात आले.



तारापोरवाला सागरी जीवशास्त्रीय संशोधन केंद्राचे मत्स्यशास्त्रज्ञ डॉ. भरत यादव, रवींद्र बोंद्रे आणि तालुका मत्स्य अधिकारी सुरेश बाऊलगावे यांनी शेतकऱ्यांना मत्स्यशेतीबाबत मार्गदर्शन केले. जिल्हाधिकारी किसन जावळे यांनी शेतीसोबत मत्स्यशेती केल्यास शेतकऱ्यांना चांगले उत्पन्न मिळू शकते, असे सांगत खारे व गोड्या पाण्यातील मत्स्यशेतीला प्रोत्साहन देण्याचे आवाहन केले.

दरम्यान, कार्यक्रमाच्या ढिसाळ नियोजनावरून शेतकरी आणि लोकप्रतिनिधींनी कृषी विभागाच्या कारभाराबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. कार्यक्रमाची माहिती शेतकऱ्यांना अवघी एक दिवस आधी, तर लोकप्रतिनिधींना रात्री उशिरा देण्यात आली. त्यामुळे कार्यक्रमासाठी पुरेसा वेळ मिळाला नाही. त्यातच तज्ज्ञांचे प्रशिक्षण अवघ्या दहा मिनिटांत उरकल्याने उपसभापती परेश ठाकूर आणि पंचायत समिती सदस्या कविता रूपेश पाटील यांनी कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला.

शेतकऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षणच घाईघाईत उरकायचे असेल तर त्याचा नेमका फायदा काय, असा सवाल उपस्थित करत पुन्हा स्वतंत्र प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्याची सूचना कविता पाटील यांनी कृषी विभागाला केली.

# मुरुड गटाची शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय भरारी

- शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश
- गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा नवा आदर्श

**। मुरुड । प्रतिनिधी ।**

मुरुड गटातील शाळांनी यंदाच्या शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत शैक्षणिक गुणवत्तेची नवी उंची गाठली आहे. इयत्ता चौथीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत ५५ विद्यार्थी, तर इयत्ता सातवीच्या शिष्यवृत्ती परीक्षेत १७ विद्यार्थी पात्र ठरले आहेत. हे यश विद्यार्थ्यांची मेहनत, शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि शाळांच्या नियोजनबद्ध प्रयत्नांचे फलित असल्याचे बोलले जात आहे.

केवळ शिष्यवृत्ती परीक्षेतील यशच नव्हे, तर शैक्षणिक गुणवत्ता, डिजिटल शाळा, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि उपक्रमशील शिक्षणपद्धती या सर्व क्षेत्रांतही मुरुड गटातील शाळांनी उल्लेखनीय आघाडी घेतली आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर, विद्यार्थीकेंद्रित अध्यापन, विविध शैक्षणिक उपक्रम आणि सातत्यपूर्ण गुणवत्ता वृद्धीमुळे विद्यार्थ्यांच्या अध्ययनात सकारात्मक व लक्षणीय बदल घडून आला आहे.

या उल्लेखनीय कार्याची दखल विविध स्तरांवर घेतली जात असून, शिक्षकांच्या समर्पणाचे आणि शाळांच्या उत्कृष्ट कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. मुरुड गटात निर्माण झालेले हे शैक्षणिक नवचैतन्य इतर शाळांसाठीही प्रेरणादायी ठरत आहे.

या यशाबद्दल सर्व विद्यार्थी, मुख्याध्यापक, शिक्षक, पालक, शाळा व्यवस्थापन समित्या तसेच शिक्षण विभागातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि समर्पित शिक्षक यांच्या एकत्रित प्रयत्नातूनच उज्ज्वल भविष्य घडते, हे मुरुड गटाने पुन्हा एकदा सिद्ध करून दाखविल्याबद्दल कौतुक करण्यात येत आहे.

# ग्रामविकास अधिकारीच गायब!

- मोहपाडा ग्रामपंचायतीचा कारभार ठप्प

**। आपटा । प्रतिनिधी ।**

मोहपाडा-वाशांबे ग्रामपंचायतीतील ग्रामविकास अधिकारीपद गेल्या पंधरा दिवसांपासून रिक्त असल्याने ग्रामपंचायतीचा कारभार अक्षरशः ठप्प झाला आहे. विविध शासकीय दाखले, ज्येष्ठ नागरिकांची कामे, विद्यार्थ्यांचे शाळेचे दाखले, उत्पन्नाचे दाखले तसेच विकासकामांशी संबंधित महत्त्वाचे निर्णय रखडल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

दि. ८ जुलै रोजी ग्रामविकास अधिकारी वैभव पाटील यांची रायगड जिल्हा परिषदेमार्फत अचानक बदली करण्यात आली. मात्र त्यांच्या जागी अद्याप नवीन ग्रामविकास अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आलेली नाही. त्यामुळे सुमारे ७० ते ७५ हजार लोकसंख्या असलेल्या मोहपाडा-वाशांबे ग्रामपंचायतीच्या कामकाजावर त्याचा मोठा परिणाम झाला आहे.

ग्रामपंचायतीमध्ये दररोज विविध कामांसाठी नागरिक येत असतात. मात्र, अधिकारीच उपलब्ध नसल्याने त्यांना हेलपाटे मारावे लागत आहेत. विद्यार्थ्यांचे दाखले, उत्पन्नाचे दाखले, ज्येष्ठ नागरिकांची कामे तसेच विविध शासकीय प्रक्रियांना विलंब होत आहे. त्याचबरोबर विकासकामांबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता असतानाही अधिकारी नसल्यामुळे अनेक कामे खोळंबली आहेत. दरम्यान, येत्या सोमवार, दि. २७ जुलैपर्यंत मोहपाडा-वाशांबे ग्रामपंचायतीला ग्रामविकास अधिकारी नियुक्त करावा, अशी मागणी ग्रामस्थांसह संदीप मुंडे यांनी केली आहे.

# सायबर फसवणूक, दोघांवर गुन्हा

**पेण :** सायबर फसवणुकीची रक्कम प्राप्त करण्यासाठी बँक खाते उघडून ते खाते इतर खात्यांमध्ये रक्कम हस्तांतरित करण्यासाठी वापरण्यास परवानगी दिल्याप्रकरणी पेण पोलिसांनी दोघांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. दि. ६ डिसेंबर २०२५ ते दि.२ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत पेण शहरातील देवआळीतील एका रहिवासी आणि पालीतील एकाने संगनमत करून सायबर फसवणुकीची रक्कम स्वीकारण्यासाठी स्टेट बँकेमध्ये खाते उघडल्याचे पोलिसांच्या नोंदीत नमूद आहे. या खात्यामध्ये २०२५-२६ या कालावधीत मोठ्या प्रमाणात सायबर फसवणुकीची रक्कम जमा करण्यात आली. त्यानंतर ही रक्कम अन्य बँक खात्यांमध्ये हस्तांतरित करण्यास परवानगी देऊन आरोपींनी जाणीवपूर्वक सहाय्य केल्याचा आरोप आहे.

# शाळांच्या वेळेत वाहतूककोंडी

## वाहतूक पोलिसांच्या नियुक्तीची मागणी



**। नवीन पनवेल । प्रतिनिधी ।**

नवीन पनवेल सेक्टर २ येथील जय अंबे माता मंदिरासमोरील रस्त्यावर शाळांच्या व्हॅन दोन्ही बाजूंनी बेकायदेशीरपणे उभ्या राहात असल्याने दररोज मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होत असल्याची तक्रार स्थानिक रहिवाशांनी केली आहे. विशेषतः दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास ही समस्या अधिक तीव्र होत असून, नागरिकांना नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

या परिसरातील डीएव्ही स्कूल आणि शांतिनिकेतन शाळा या दोन्ही शाळांची सुट्टी आणि प्रवेशाची वेळ जवळपास एकाच वेळी असल्यामुळे मोठ्या संख्येने शाळेच्या व्हॅन आणि इतर वाहने एकाच वेळी रस्त्यावर येतात. त्यातच रस्त्याच्या दोन्ही बाजूंना व्हॅन उभ्या केल्या जात असल्याने वाहतुकीचा वेग मंदावतो आणि काही काळासाठी संपूर्ण रस्ता ठप्प होतो. या वाहतूक कोंडीचा फटका स्थानिक रहिवासी, पादचारी, ज्येष्ठ नागरिक तसेच इतर वाहनचालकांना दररोज बसत आहे. त्यामुळे दोन्ही शाळांच्या सुट्टीचा आणि भरण्याच्या वेळेत किमान १५ मिनिटांचा फरक ठेवावा, तसेच शाळा सुरू होण्याच्या आणि सुटण्याच्या वेळेत कायमस्वरूपी वाहतूक पोलिसांची नियुक्ती करावी, अशी मागणी परिसरातील रहिवाशांनी संबंधित प्रशासन आणि वाहतूक विभागाकडे केली आहे. नागरिकांच्या मते, वेळेत योग्य नियोजन आणि वाहतूक नियंत्रणाची प्रभावी अंमलबजावणी झाल्यास या परिसरातील दररोजची वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणात कमी होऊ शकते. तरी, या गंभीर बाबीकडे पोलीस प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून कार्यवाही करावी, अशी मागणी होत आहे.

पान १ वरून

## शिवतीर्थावर विजयाचा जल्लोष

सभा आयोजित करण्यात आली.

या जल्लोष सभेसाठी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे प्रमुख राज ठाकरे, शिवसेनेचे युवा नेते आदित्य ठाकरे, खा. संजय राऊत, खा. अरविंद सावंत, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार, खा. अनिल देसाई, आ. अंबादास दानवे, आ. महेश सावंत, आ. मिलिंद नार्वेकर, ज्येष्ठ नेते चंद्रकांत खैरे, सुभाष देसाई, शेतकरी कामगार पक्षाच्या राज्य प्रवक्त्या चित्रलेखा पाटील, मुंबईच्या माजी महापौर किशोरी पेडणेकर, मनसेचे अमित ठाकरे, शेकाप पुरोगामी विद्यार्थी संघटनेच्या अध्यक्ष ॲड. साम्या कोरडे यांच्यासह महाविकास आघाडीतील घटक पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांसह हजारोंच्या संख्येने विद्यार्थी व त्यांचे पालक उपस्थित होते. यावेळी केंद्र सरकारचा निषेधाच्या घोषणाबाजीने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

यावेळी राज ठाकरे यांनी आत्महत्या केलेल्या सर्व २१ विद्यार्थ्यांची नावे घेत त्यांना आदरांजली वाहिली. तर उद्धव ठाकरे यांनी, हा लढा देशभक्त विरुद्ध अंधभक्त असा होता आणि आपण तो जिंकला, असे विधान केले.

सभेची सांगता राष्ट्रगीताने करण्यात आली. त्यानंतर वंदे मातरम् हे गीत लावण्यात आले. यावेळी उपस्थितांनी तिरंगा फडकवत विजयाचा जल्लोष साजरा केला.

दिल्लीत महिनाभरापासून देशभरातील लाखो विद्यार्थ्यांनी आंदोलन पुकारले होते. सामाजिक कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनीही २० दिवस उपोषण केले. त्यानंतर पोलिसांनी त्यांना बळाचा वापर करत ताब्यात घेतले. या घटनेनंतर विद्यार्थी अधिक आक्रमक झाले आणि त्यांनी 'चलो संसद' मोर्चा काढला. या मोर्चावर पोलिसांनी लाठीचार्ज केला. मात्र, त्यानंतरही विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरूच ठेवले. अखेर या आंदोलनाचा परिणाम म्हणून केंद्र सरकारला माघार घ्यावी लागली आणि धर्मेंद्र प्रधान यांना राजीनामा द्यावा लागला.

### अंधभक्तांविरोधात देशभक्त जिंकले!

करता येत नाही. मनं चोरता येत नाही. ही मनं आता पेटलेली आहेत. ही ठिणगी जागती ठेवणं आपल्या सर्वांचं काम आहे. आता भोंदूत्व स्वीकारणारे अंधभक्त मुलांना धमक्या देतायत. त्यांचे व्हिडीओ काढा आणि पोस्ट करा. जिथे सापडतील त्यांना राष्ट्रभक्ती शिकवा, असेही उद्धव ठाकरे यांनी तरुणांना सांगितले आहे.

तरुणांनी देशाच्या इतिहासातलं सुवर्ण पान लिहलं आहे. तुमच्या शक्तीची एकजुटीची नोंद देशाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी झाल्याशिवाय राहणार नाही. पण, आता आलेली ही जाग जाऊ देऊ नका. सत्ताधाऱ्यांची मस्ती सहन करू नका. देशाची शक्ती काय असते ते दाखवून दिलेल्या देशाला पुन्हा कुणाला कमजोर करू देऊ नका, असे आवाहन उद्धव ठाकरे यांनी तरुणांना केले.

### तरुणांच्या ताकदीने सरकारच्या झिंज्या उपटल्या!

विजय नाही, तर अन्यायाविरोधात उभ्या राहिलेल्या तरुणाईच्या जिद्दीचा आणि लढवय्या वृत्तीचा विजय आहे, असे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी सांगितले. यावेळी त्यांनी केंद्र सरकारचा खरपूस समाचार घेतला.

## रायगड जिल्हा परिषद अध्यक्षांचे तुघलकी फर्मान?

संवेदनशील विषयांबाबत प्रसारमाध्यमांना माहिती देण्यापूर्वी अध्यक्षांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक राहील. याशिवाय कोणताही अधिकारी किंवा पदाधिकारी पूर्वपरवानगीशिवाय किंवा अधिकृतपणे नियुक्त नसताना प्रसारमाध्यमांसमोर शासकीय अथवा वैयक्तिक विधाने करू नयेत, असेही अध्यक्षांनी काढलेल्या आदेशात नमूद केले आहे.

या आदेशाची वेळही तितकीच महत्त्वाची मानली जात आहे. रायगड जिल्हा परिषदेत भाजप, राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना यांची युती असली तरी अंतर्गत मतभेद लपून राहिलेले नाहीत. सुरुवातीला शिवसेनेला सत्तेपासून दूर ठेवण्यात आले होते. त्यानंतर मोठ्या राजकीय घडामोडींनंतर शिवसेनेचा सत्तेत समावेश करण्यात आला. आजही सभागृहात भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे सदस्य एकत्र बसतात, तर शिवसेनेचे सदस्य स्वतंत्र बाकांवर बसतात. या पार्श्वभूमीवर हा आदेश केवळ प्रशासकीय शिस्तीसाठी आहे की काही विशिष्ट सदस्य, पदाधिकारी किंवा राजकीय घटकांचा आवाज नियंत्रित करण्याचा प्रयत्न आहे, असा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक मानला जात आहे.

अध्यक्षांना हा अधिकार नेमका कोणत्या कायद्याने दिला आहे? महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, १९६१ मध्ये अध्यक्षांचे अधिकार स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहेत. बैठका घेणे, कामकाजावर देखरेख ठेवणे, मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून माहिती मागविणे, नोंदी तपासणे आणि अधिनियमाने दिलेली इतर कार्ये पार पाडणे हे अधिकार त्यात आहेत. परंतु, प्रसारमाध्यमांना माहिती देण्यापूर्वी अध्यक्षांची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्याचा अधिकार या अधिनियमात स्पष्टपणे कुठेही नमूद नाही. विशेष म्हणजे, अध्यक्षांच्या पत्रातही कोणत्या कलमाचा, कोणत्या नियमाचा किंवा कोणत्या शासन निर्णयाचा आधार घेऊन हा आदेश दिला आहे, याचा साधा उल्लेखदेखील आढळत नाही. त्यामुळे हा आदेश कायद्याच्या चौकटीत आहे की अधिकारांच्या मर्यादेबाहेर जाऊन दिलेला आहे, हा मूलभूत प्रश्न निर्माण झाला आहे.

या आदेशाचा परिणाम केवळ अधिकारी, कर्मचारी किंवा पदाधिकाऱ्यांपुरता मर्यादित राहणार नाही. त्याची सर्वात मोठी झळ बसू शकते ती लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाला, स्वतंत्र प्रसारमाध्यमांना. जिल्हा परिषदेतील निर्णय, विकासकामे, आर्थिक व्यवहार, अनियमितता, भ्रष्टाचार, जनहिताचे प्रश्न किंवा प्रशासनातील त्रुटी यांची माहिती सर्वप्रथम प्रसारमाध्यमांपर्यंत पोहोचते आणि त्यानंतर ती जनतेसमोर येते. मात्र, अध्यक्षांच्या पूर्वपरवानगीशिवाय माहिती देऊ नका असा आदेश म्हणजे माहितीच्या प्रवाहावरच नियंत्रण आणण्याचा प्रयत्न तर नाही ना? उद्या एखाद्या अधिकाऱ्याला भ्रष्टाचार उघड करायचा असेल, एखाद्या लोकप्रतिनिधीला जनतेच्या हिताचा मुद्दा मांडायचा असेल किंवा प्रशासनातील गंभीर अनियमितता माध्यमांसमोर आणायची असेल, तर त्यासाठीही अध्यक्षांची परवानगी घ्यावी लागणार का? मग भ्रष्टाचार उघडकीस येणार कसा? जनतेला सत्य समजणार कसे? लोकशाहीत प्रसारमाध्यमे ही सत्तेची जनसंपर्क यंत्रणा नसून सत्तेवर पहारा देणारा चौथा स्तंभ आहेत. त्यामुळे हा आदेश केवळ अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांवर निर्बंध घालणारा नसून स्वतंत्र पत्रकारितेची मुस्कटदाबी, माहितीच्या मुक्त प्रवाहावर अंकुश आणि जनतेच्या माहितीच्या अधिकारावर अप्रत्यक्ष घाला घालण्याचा प्रयत्न तर नाही ना, असा अत्यंत गंभीर प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

**माहितीबंदी थेट मुख्यमंत्र्यांच्या दरबारी!**

रायगड जिल्हा परिषद प्रशासनाकडून काढण्यात आलेल्या वादग्रस्त आणि माहितीबंदी लादणाऱ्या परिपत्रकाविरोधात आता संतापाची लाट उसळली आहे. जिल्हा परिषदेच्या या हुकूमशाही निर्णयाविरोधात सामाजिक कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे तक्रार अर्ज दाखल केला आहे. हे वादग्रस्त परिपत्रक तात्काळ रद्द करण्याचे आदेश द्यावेत, अशी ठाम मागणी या पत्राद्वारे करण्यात आली आहे. या तक्रार पत्राच्या प्रती माहिती व योग्य त्या कारवाईसाठी ग्रामविकास मंत्री तसेच विभागीय आयुक्त (कोकण विभाग) यांच्याकडेही पाठवण्यात आल्या आहेत.

## १२ वर्षीय मुलाचा बुडून मृत्यू

उडाली आणि नागरिकांनी घटनास्थळी गर्दी केली. घटनेचे गांभीर्य ओळखून तातडीने कळंबोली अग्निशमन दल आणि खांदेश्वर पोलीस ठाण्याचे पथक घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या जवानांनी रबरी बोट, दोरी आणि सुरक्षा उपकरणांच्या सहाय्याने तात्काळ पाण्यात उतरून शोधमोहीम सुरू केली. सुमारे ३० मिनिटांच्या अथक शोधमोहिमेनंतर जवानांनी मुलाला पाण्यातून बाहेर काढले. त्याला तातडीने उपचारासाठी पनवेल येथील उपजिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले, मात्र तेथील डॉक्टरांनी तपासणीअंती उपचारापूर्वीच त्याला मृत घोषित केले. अशा प्रकारच्या उघड्या आणि धोकादायक खड्ड्यांमुळे निष्पाप बालकाचा जीव गेल्याने आसुडगाव ग्रामस्थांमध्ये मोठा शोक पसरला असून, निष्काळजीपणा करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मागणी केली जात आहे. खांदेश्वर पोलीस या घटनेचा अधिक तपास करत आहेत.

## 'महसूल'चे कामबंद आंदोलन

झाल्यास महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ नुसार विभागीय कारवाईची तरतूद असताना थेट फौजदारी गुन्हा दाखल करून अटक करण्याच्या कारवाईवर संघटनेने आक्षेप घेतला आहे.

तसेच, सात वर्षांपर्यंत शिक्षेची तरतूद असलेल्या गुन्ह्यांमध्ये अटक करण्यापूर्वी आवश्यक कायदेशीर प्रक्रिया व चौकशी करणे अपेक्षित असताना कोणतीही तांत्रिक अथवा महसुली चौकशी न करता जाधव यांना अटक करण्यात आल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.जाधव यांच्यावरील अटकेच्या कारवाईचा फेरविचार करून त्यांची मुक्तता करावी, त्यांच्यावरील गुन्हा रद्द करावा, सतीश ढवळे यांना अटक करू नये, अशी प्रमुख मागणी संघटनेने केली आहे. तसेच या प्रकरणाचा तपास पोयनाड पोलीस ठाण्याकडून काढून उपविभागीय पोलीस अधिकारी अथवा स्थानिक गुन्हे शाखेकडे वर्ग करावा आणि तपासात वरिष्ठ महसूल अधिकाऱ्यांचे तांत्रिक अभिप्राय घेण्यात यावेत, अशी मागणीही करण्यात आली आहे.

दरम्यान, संबंधित पोलीस अधिकाऱ्यांनी पदाचा गैरवापर करून थेट अटकेची कारवाई केली असल्यास त्यांच्यावरही कारवाई करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

महसूल कर्मचाऱ्यांवरील अशा प्रकारची फौजदारी कारवाई थांबवून मागण्यांवर सकारात्मक निर्णय न झाल्यास सोमवार, दि. २७ जुलैपासून रायगड जिल्ह्यातील तलाठी, मंडळ अधिकारी, महसूल सेवक तसेच अन्य महसूल कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलन करतील, असा स्पष्ट इशारा रायगड महसूल कर्मचारी संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून दिला आहे.

## कर्जत-कशेळे रुग्णालयात 'उपचार' मिळेनात!

आदिवासी नागरिक वास्तव्यास असताना सरकारी रुग्णालयातच वेळेवर उपचार मिळत नसतील, तर या नागरिकांनी उपचारासाठी जायचे कुठे, असा संतप्त सवाल उपस्थित होत आहे. सरकारी रुग्णालयात उपचाराऐवजी खासगी रुग्णालयाचा मार्ग दाखविला जात असेल, तर सर्वसामान्यांसाठी उभारलेल्या या आरोग्य व्यवस्थेचा नेमका उपयोग काय? असा प्रश्नही नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.

**तज्ज्ञ डॉक्टरच नाहीत; मग प्रसूती सेवा कशी मिळणार?**

कर्जत उपजिल्हा रुग्णालयात सध्या स्त्रीरोगतज्ज्ञ आणि भूलतज्ज्ञ उपलब्ध नसल्याने प्रसूतीच्या गुंतागुंतीच्या प्रकरणांतील महिलांना पुढील उपचारासाठी इतरत्र पाठविले जात असल्याची माहिती समोर आली आहे. रुग्णालयाच्या आस्थापनेवरील प्रसूतीतज्ज्ञ डॉ. रामदास तरपेवाड यांना २०२३ मध्ये माणगाव उपजिल्हा रुग्णालयात पाठविण्यात आले. त्यानंतर कर्जत उपजिल्हा रुग्णालयात कायमस्वरूपी स्त्रीरोगतज्ज्ञ उपलब्ध नसल्याचे सांगण्यात येते.



## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील श्री. गिरीश परशुराम खानविलकर, रा. जोगेश्वरी पुर्व, मुंबई हे खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक कु. पुर्वा संदिप कदम, रा. पाली, ता. सुधागड यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे-गोंडाळे, ता. सुधागड, जि. रायगड**

| गट नं. | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|
| २२६/१अ | २-०१-०० | ०.४८ |
| पैकी मिळकत मालक हिचे मालकीचे क्षेत्र ०-२८-०० हे.आर | | |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : २७/०७/२०२६

सही/-
**ॲड. समिर अनंत आंबोलकर**
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली,
ता.सुधागड, जि.रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **नागाव मधील हॉटेल मध्ये काम करण्यासाठी स्टाफची** आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, कॉन्टिनेंटल कुक, वेटर, हाऊसकिपर, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा. अथवा व्हॉटसॲप वर मेसेज करावा. **मोबाईल :** ७५५९१८४६१२
- **अलिबाग साईइन रिसॉर्ट येथे** बँक ऑफिससाठी रिटायर व्यक्ती Computer ज्ञान आवश्यक व वेटर पाहिजेत. अर्जासह समक्ष भेटा साई इन रिसॉर्ट, चोंढी, अलिबाग.
- **८-१५ ते १० या** वेळात घरकामासाठी बाई पाहिजे. **संपर्क**-९२८४५५५३१४

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**

## निवडक

### शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी पात्र शेतकऱ्यांची यादी जाहीर

**अलिबाग :** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी रायगड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पात्र शेतकऱ्यांची यादी शुक्रवारी (दि.२४) प्राप्त झाली आहे. या पात्र शेतकऱ्यांची यादी संबंधीत विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था सचिव किंवा सीएससी संस्थेचे कार्यालयव बँक स्तरावर उपलब्ध आहेत. या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांना अग्रीस्टँक फार्मर आयडी क्रमांक अनिवार्य असून, ज्या शेतकऱ्यांचा अग्रीस्टॅक नोंदणी नसेल त्यांनी तात्काळ जवळच्या आपले सरकारी केंद्र किंवा सीएसी केंद्रावर जाऊन अग्रीस्टॅक नोंदणी करणे बंधनकारक आहे. तरी, कर्जमाफीचा लाभ मिळण्यासाठी या यादीमधील सर्व पात्र शेतकऱ्यांनी आपल्या जवळच्या आपले सरकार केंद्र किंवा सीएससी केंद्र येथे जाऊन आधार प्रमाणीकरण करुन घेणे गरजेचे आहे. त्यासाठीची संपूर्ण प्रकिया ही जिल्हयामधील सर्व आपले सरकार केंद्र किंवा सीएससी केंद्र आणि बँकेच्या शाखेत प्रसिद्ध करण्यात आली आहे. या आधार प्रमाणिकरणाची प्रक्रिया ही विनामुल्य असून, कोणत्याही केंद्रावर पात्र लाभार्थ्यांनी आधार प्रमाणिकरणासाठी कोणतीही रक्कम आदा करु नये, असे आवाहन सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक तनवीर पाटील यांनी केले आहे.



### वृक्ष दिंडी सोहळा उत्साहात

**पाली/गोमाशी :** पर्यावरण रक्षणाचा संदेश देत सुधागड तालुक्यातील नांदगाव येथील संत नामदेव माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात ''आज एक झाड लावूया, उद्याचे भविष्य घडवूया'' या घोषणेसह वृक्षारोपण कार्यक्रम मोठ्या उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते वृक्ष दिंडीचे पूजन करून शालेय परिसरात वृक्ष लागवड करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी वारकरी संप्रदायाची पारंपरिक वेशभूषा परिधान केली होती. कार्यक्रमाचा मुख्य आकर्षण म्हणजे नांदगाव ते नागशेत रस्त्याकडील गोमाशी येथील विठ्ठल रखुमाई मंदिरापर्यंत विद्यार्थी आणि पंचक्रोशीतील नागरिकांनी पायी दिंडी काढली. यावेळी हरिनामाचा जयघोष करत पालखी सोहळ्याचा आनंद घेत पर्यावरण आणि अध्यात्माचा अनोखा संगम साधण्यात आला. यावेळी अनुप गुप्ता, सुधीर मराठे, अमिता गुप्ता, सायली मराठे, नांदगावचे सरपंच जालिंदर खैरे, प्राचार्य अशोक शिंदे, मुरलीधर सुतार, शांताराम लहाने, सखाराम खैरे तसेच नांदगाव-गोमाशी येथील वारकरी मंडळी, महिला-पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य अशोक शिंदे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

### जेएसएसद्वारा आरी वर्क हस्तकला



**रसायनी :** जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून रविवारी (दि.२६) विणेगाव-खालापूर येथे आरी वर्क हस्तकला कार्यशाळा व कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. तसेच, या कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथही देण्यात आली. तसेच, प्रमाणपत्रही वाटप करण्यात आले.रायगड जिल्हाभरात जेएसएस रायगडच्या माध्यमातून दि.१५ ते ३१ जुलै या १५ दिवसांच्या कालावधीत विविध स्वच्छतेवर आधारित जनजागृती कार्यक्रम व उपक्रम स्वच्छता पखवाडा उपक्रमाअंतर्गत राबविण्यात येणार आहे, अशी माहिती संचालक डॉ. विजय कोकणे यांनी दिली आहे. यावेळी स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून विणेगाव-खालापूर येथे आरी वर्क हस्तकला कार्यशाळा व कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाप्रसंगी कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, बचतगट पूजा गरुडे, प्रशिक्षिका स्वप्नाली म्हात्रे, सिद्धी साळुंके व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

### वाहतूक कोंडीवर उपाययोजनेची मागणी

**पनवेल :** कळंबोली, कामोठे आणि खांदा कॉलनी परिसरातील वाढती वाहतूक कोंडी, बेकायदेशीर पार्किंग व विस्कळीत वाहतूक व्यवस्थेमुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत आहे. त्याची दखल घेत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हाप्रमुख दीपक निकम यांनी कळंबोली वाहतूक शाखेच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षकांना निवेदन देत तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. निवेदनानुसार, कळंबोली, कामोठे व खांदा कॉलनी परिसरात वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि सुरू असलेल्या विविध विकासकामांमुळे वाहतूक व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. अंतर्गत रस्त्यांवर दोन्ही बाजूंनी होणाऱ्या बेकायदेशीर पार्किंगमुळे रस्ते अरुंद होत असून, नागरिकांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. शाळा व महाविद्यालयांच्या परिसरात विद्यार्थ्यांना सोडण्यासाठी येणाऱ्या वाहनांमुळे सकाळी आणि सुट्टीच्या वेळेत वाहतूक विस्कळीत होत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# सुनील सोनावणे यांच्यावर भ्याड हल्ला



■ उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांना निवेदन
■ दोषींवर कठोर कारवाईची मागणी

**| वावोशी | प्रतिनिधी |**

सामाजिक कार्यकर्ते सुनील सोनावणे आणि मोनिकेत पाटील यांच्यावर झालेल्या कथित जीवघेण्या हल्ल्याच्या निषेधार्थ बौद्ध समाजबांधव, आंबेडकरी अनुयायी, कामगार आणि विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी खालापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल यांना निवेदन देत दोषींवर कठोर कायदेशीर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

दि.२३ जुलै रोजी काही समाजकंटकांनी लोखंडी रॉडसह सुनील सोनावणे व मोनिकेत पाटील यांच्यावर जीवघेणा हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. सामाजिक न्यायासाठी कार्यरत असलेल्या कार्यकर्त्यांवर झालेला हा हल्ला केवळ एका व्यक्तीवरील नसून, समाजात भीतीचे वातावरण निर्माण करणारा आणि कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणारा प्रकार असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

खालापूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहुल यांना देण्यात आलेल्या निवेदनाद्वारे हल्ल्यातील सर्व आरोपींना तात्काळ अटक करावी, भारतीय न्याय संहिता व इतर लागू कायद्यांनुसार कठोर कारवाई करावी, हल्ल्यामागील सूत्रधार व सहआरोपींचा शोध घेऊन त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई करावी, पीडितांना आवश्यक कायदेशीर मदत व संरक्षण द्यावे तसेच भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या आहेत. यावेळी अखिल भारतीय बौद्ध महासंघाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष दिलीप मोरे, दीपक खाडे, रिपब्लिकन कार्यकर्ते महेंद्र धनगावकर, गोपीनाथ सोनावणे, अशोक गोतार्णे, सूर्यकांत कांबळे, जतिन मोरे, राकेश गायकवाड, गणेश मोरे, संदीप गायकवाड, पांडुरंग मोरे, जगदीश कांबळे, भगवान यादव, पंकज सोनवणे, दिनेश मोरे, सचिन मोरे, अजित मोरे, दीपक गायकवाड, लक्ष्मण गायकवाड, शिवाजी राठोड, अतिश सोनावणे, रुपेश कांबळे, प्रफुल्ल सोनावळे, शरद थोरात, अजय सोनावणे यांच्यासह छत्तीशी व खालापूर परिसरातील बौद्ध समाजाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक उपस्थित होते.

> सुनील सोनावणे यांनी नेहमीच सामान्य नागरिक, कामगार आणि अन्यायग्रस्तांच्या बाजूने उभे राहून संघर्ष केला आहे. त्यांच्यावर झालेल्या हल्ल्यामुळे परिसरात भीती आणि संतापाचे वातावरण आहे. पोलिसांनी या प्रकरणाचा निष्पक्ष व सखोल तपास करून दोषींना तातडीने अटक करावी आणि अशा घटना पुन्हा घडणार नाहीत, याची खात्री करावी.
> – अतिश सोनावणे, स्थानिक ग्रामस्थ

> सुनील सोनावणे हे अन्यायाविरुद्ध निर्भीडपणे आवाज उठवणारे सामाजिक कार्यकर्ते आहेत. त्यांनी कामगारांच्या प्रश्नांसाठी युनियन स्थापन करून अनेकांना न्याय मिळवून देण्याचे काम केले. त्याचबरोबर त्यांनी बांधकाम क्षेत्रातही पाऊल टाकत स्वतःच्या कष्टाच्या जोरावर प्रगती करण्यास सुरुवात केली होती. ही प्रगती काही प्रस्थापितांच्या डोळ्यात खुपत होती. या पार्श्वभूमीवर त्यांच्यावर झालेला हल्ला अत्यंत निषेधार्ह असून या प्रकरणामागील सर्व सूत्रधारांचा शोध घेऊन दोषींवर कठोर कारवाई झालीच पाहिजे.
> –महेंद्र धनगावकर, रिपब्लिकन कार्यकर्ते

# तनिष्का नाईक 'आदर्श शिक्षक'



**| चौल | प्रतिनिधी |**

दैनिक पुढारीच्यावतीने देण्यात येणारा यंदाचा 'आदर्श शिक्षक सन्मान २०२६' चौलमळा येथील शिक्षिका तनिष्का नाईक यांना प्रदान करण्यात आला. ठाणे येथील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात शनिवारी (दि.२५) पार पडलेल्या कार्यक्रमात राज्याचे सांस्कृतिक विभाग मंत्री आशिष शेलार, आ. निरंजन डावखरे, आ. संजय केळकर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.

'पुढारी'च्या आदर्श शिक्षक पुरस्काराचे हे यंदाचे पाचवे वर्ष असून, राज्यभरातील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय आणि प्रेरणादायी कार्य करणाऱ्या शिक्षकांचा या पुरस्काराने गौरव करण्यात येतो. अध्यापनाच्या पलीकडे जाऊन विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान देणाऱ्या शिक्षकांच्या कार्याची दखल घेऊन त्यांच्या कर्तृत्वाला प्रोत्साहन देण्याचा या पुरस्कारामागील उद्देश आहे.

सध्या अलिबाग तालुक्यातील संचालक मंडळ हायस्कूल नागावमध्ये कार्यरत असलेल्या तनिष्का नाईक यांनी आपल्या अध्यापन कार्यासोबतच विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी विविध उपक्रम राबविले आहेत. विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नैतिक मूल्ये, सामाजिक जाणीव आणि आत्मविश्वास निर्माण करण्याबरोबरच त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी त्या सातत्याने प्रयत्नशील असतात. त्या स्वतः तंत्रस्नेही असून, विद्यार्थ्यांना तंत्रस्नेही व सर्वसमावेश अध्यापनासोबत कृतीयुक्त प्रात्यक्षिकांवर भर देत असतात. बदलत्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांवर होणारा सामाजिक माध्यमांचा प्रभाव लक्षात घेऊन त्यांना योग्य मार्गदर्शन करणे, विविध स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे तसेच सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविण्यासाठी त्यांनी विशेष योगदान दिले आहे. आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना मदतीचा हात देत शिक्षणाची गोडी आणि सामाजिक बांधिलकी जपण्याचे कामही त्या करीत आहेत.

२००३ मध्ये युवा कार्य व क्रीडा मंत्रालयांतर्गत राष्ट्रीय एकात्मता शिबिरामध्ये रायगड जिल्ह्यास विविध बक्षिसे मिळवून देऊन त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. तसेच, कोविड काळात बंद पडलेली संगणक प्रयोगशाळा स्वखर्चातून सुरू करून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांचीही दखल घेण्यात आली. त्यांच्या शिक्षण क्षेत्रातील कर्तव्यनिष्ठ, उल्लेखनीय आणि समाजाभिमुख कार्याची दखल घेत 'पुढारी'कडून त्यांना हा मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी त्यांचे पती नमित नाईक, सासूबाई शालिनी नाईक, सासरे जयंत नाईक यांच्यासह कुटुंबीय व मान्यवर उपस्थित होते. तनिष्का नाईक यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल त्यांच्यावरसर्वस्तरातूनअभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## कर्जतमधील महसूल कर्मचारी संपावर



**| नेरळ | प्रतिनिधी |**

जिल्ह्यातील महसूल कर्मचारी असलेले पेण तालुक्यातील मंडळ अधिकारी रविकांत जाधव यांच्या अटकेविरोधात रायगड महसूल कर्मचाऱ्यांनी सोमवारपासून बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. या आंदोलनात कर्जत तालुका महसूल कर्मचारी संघटना सहभागी होणार असून, याबाबत तहसीलदार आणि प्रांत अधिकाऱ्यांना निवेदन दिले आहे.

मंडळअधिकारीरविकांतजाधव यांनी शासकीय कर्तव्य बजावत असताना त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून थेट अटक करण्यात आली. महसूल अधिकाऱ्यांनी केलेल्या शासकीय कामकाजाबाबत कारवाई करण्यासाठी ठरावीक कायदेशीर प्रक्रिया असून, तिचे पालन झाले नसल्याचा दावा संघटनेने केला आहे. याबाबत संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांकडे तीन मागण्या केल्या आहेत. रविकांत जाधव यांच्यावरील अटकेचा फेरविचार करून संबंधित पोलीस अधिकाऱ्यावर कारवाई करावी, प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर योग्य ती कार्यवाही करावी आणि भविष्यात अशा प्रकारे थेट गुन्हे दाखल करून अटक करण्याच्या घटना टाळाव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. मागण्यांची पूर्तता न झाल्यास दि. २७ जुलैपासून महसूल कर्मचारी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करणार आहेत.

## आंबोली धरण पर्यटकांनी ओव्हरफ्लो



(छायाचित्रः गणेश चोडणेकर)

**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड-खारआंबोली येथील आंबोली धरण पूर्ण क्षमतेने भरल्याने धरणाच्या सांडव्यातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू झाला आहे. हे मनमोहक दृश्य पाहण्यासाठी व त्यात पोहण्याचा आनंद घेण्यासाठी स्थानिक नागरिक व पर्यटकांची मोठी गर्दी होत आहे. याठिकाणी रोज अनेक जण कुटुंबासह व मित्रपरिवारासोबत भेट देत आहेत. तसेच, पर्यटकांकडून छायाचित्रे व सेल्फी काढण्याचीही मोठी क्रेझ दिसून येत आहे. धरणाचा ओव्हरफ्लो पाहण्यासाठी येणाऱ्या पर्यटकांमुळे परिसरातील छोट्या व्यावसायिकांनाही चांगला व्यवसाय मिळत आहे.

## वाघ्रण ग्रामपंचायतीच्या इमारतीचे भूमीपूजन



**| वाघ्रण | प्रतिनिधी |**

अलिबाग तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत वाघ्रणच्या इमारतीचे भूमिपूजन शुक्रवारी (दि.२४) पार पडले.शेतकरी कामगार पक्षाच्या प्रवक्त्या चित्रलेखा पाटील यांच्या प्रयत्नाने आणि मार्गदर्शनाने हा कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी अलिबाग पंचायत समितीचे माजी उपसभापती अनिल पाटील, सरपंच राजेंद्र पाटील, शेकापचे ज्येष्ठ कार्यकर्ते आर.बी. पाटील, आत्माराम पाटील, अविनाश म्हात्रे, ग्रामपंचायत सदस्य हरीश्चंद्र पाटील, सदस्या सुप्रिया पाटील, पुष्पलता पाटील व कार्यकर्ते राजू पाटील आदींच्या हस्ते भूमिपूजन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठाचे देखील आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रमुख अतिथी आणि कार्यकर्त्यांचे स्वागत सरपंच राजेंद्र पाटील यांनी केले. तर, प्रास्ताविक वाघ्रण ग्रामपंचायतीचे माजी सदस्य दिपक पाटील यांनी केले. यावेळी शेकापकडून झालेली विकास कामे, सत्ता नसतानाही काम करण्याची पद्धत अन् वेग आणि विकास कामांबाबतची दूरदृष्टी या बाबत चित्रलेखा पाटील यांची स्तुती करण्यात आली. तसेच, त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर प्रमुख अतिथी अनिल गोमा पाटील यांनी शेकापच्या माध्यमातून वाघ्रण-खारपेढांबेमध्ये झालेल्या विकासावर भाष्य केले. तसेच, शेकापचे सरचिटणीस जयंत पाटील यांनी सोडवलेल्या पिण्याच्या पाण्याच्या समस्ये बाबत सविस्तर विचार मांडले. या कार्यक्रमाला दीपक पाटील, अभिषेक पाटील, ग्रामपंचायत अधिकारी सुवर्णा पाटील, सदस्य रुपेश पाटील, नितीन पाटील, हरिश्चंद्र भाईर, दशरथ पाटील, बळवंत गावंड, रविकीरण पाटील, एच.एन. पाटील, गिरीश पाटील आदींसह शेकाप कार्यकर्ते, महिला आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आयेशा पुरकरची देदीप्यमान कामगिरी



**| आगरदांडा | प्रतिनिधी |**

मुरूड शहरातील लक्ष्मीखार येथील आयेशा पुरकर हिने पुणे विद्यापीठांतर्गत अजिंक्य डी.वाय. पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग येथील बॅचलर ऑफ इंजिनिअरिंग शाखेत ९७ टक्के गुण मिळवुन उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या उज्ज्वल यशामुळे आयेशा हिने केवळ महाविद्यालयाचे नव्हे, तर मुरुड शहराच्या शैक्षणिक लौकिकात देखील मानाचा तुरा रोवला आहे.

आयेशा पुरकर हिने कठोर परिश्रम, सातत्यपूर्ण अभ्यास, वेळेचे प्रभावी नियोजन आणि जिद्दीच्या जोरावर हे यश प्राप्त केले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा सायन्ससारख्या आधुनिक व स्पर्धात्मक शाखेत मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. या नेत्रदीपक कामगिरीबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, पालक, नातेवाईक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदनाचा वर्षाव केला असून, भविष्यातही तो शैक्षणिक व व्यावसायिक क्षेत्रात अशीच अल्लेखनीय भरारी घेईल, असा विश्वास आयेशा पुरकरचे वडील शहबाज पुरकर यांनी व्यक्त केला आहे.

## शेतकरी सन्मान पुरस्काराने गौरव



(छायाचित्रः महेश पवार)

**| नागोठणे | प्रतिनिधी |**

बेभरवशाच्या पावसामुळे मला शेती करता आली नाही आणि त्यामुळे नोकरी स्वीकारावी लागली. मात्र, रायगड जिल्ह्यात शेतीसाठी अत्यंत पोषक वातावरण आहे. त्यामुळे तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता शेती व शेतीपूरक व्यवसायाकडे वळले पाहिजे. सेंद्रिय शेती ही काळाची गरज असून, रासायनिक खतांच्या अतिरेकामुळे कर्करोगासारख्या आजारांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे गांडूळ खताचा वापर करून येथील शेतकऱ्यांनी नैसर्गिक शेतीला व कृषी पर्यटनाला प्राधान्य द्यावे, असे बहुमोल मार्गदर्शन नागोठण्याचे प्रभारी अधिकारी आणि कृषी विषयात एमएससी पदवी प्राप्त केलेले रविंद्र पारखे यांनी केले.

रायगड प्रेस क्लब संलग्न नागोठणे ग्रामीण विभाग पत्रकार असोसिएशनच्यावतीने शेतकरी सन्मान पुरस्कार वितरण सोहळा शुक्रवारी (दि.२४) ऐनघर ग्रामपंचायत कार्यालयात पार पडला. त्यावेळी रविंद्र पारखे बोलत होते. यावेळी प्रगतशील ज्येष्ठ शेतकरी महादेव मोहिते, तसेच प्रयोगशील व प्रगतशील शेतकरी मनिष जांबेकर यांना मान्यवरांच्या हस्ते शेतकरी सन्मान पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला राष्ट्रवादीचे भाई टके, प्रभारी अधिकारी सपोनि रविंद्र पारखे, रोहा तालुका कृषी अधिकारी महादेव करे, ऐनघर ग्रामपंचायत अधिकारी गोविंद शिद, सरपंच कलावती कोकळे, माजी उपसरपंच मनोहर सुटे, तलाठी योगेश वार्डे, पत्रकार असो.चे शामकांत नेरपगार, ॲड. महेश पवार, राजेंद्र जोशी, विनोद भोईर, दिनेश ठमके, राजेश पिंपळे, वर्षा सहस्त्रबुद्धे यांच्यासह ग्रामपंचायत कर्मचारी, शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, प्रास्ताविक व आभार प्रदर्शन असो.चे अध्यक्ष ॲड. महेश पवार यांनी केले.

**शाडू माती अन् कागदी लगद्यापासून मूर्ती | बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी**

# गीध कुटुंबाचा शतकभराचा कलावारसा

**| रसायनी/आपटा | प्रतिनिधी |**

पुठ्ठ्याचा लगदा आणि शाडूची माती एकत्र करून गणेशमूर्ती बनविण्याचे काम मोहोपाडा-शिवनगर येथील गीध कुटुंबीय करत आहेत. मातीच्या मूर्तीपेक्षा वजनाने हलक्या असणाऱ्या या मूर्तींना सध्या बाजारात मोठ्या प्रमाणात मागणी आहे.

काळ बदलला, तंत्रज्ञान बदलले आणि बाजारपेठही बदलली; मात्र, मोहोपाडा येथील गीध कुटुंबियांनी शतकभरापासून जोपासलेली गणेशमूर्ती घडविण्याची परंपरा आजही तितक्याच श्रद्धेने, निष्ठेने आणि कलात्मकतेने जिवंत ठेवली आहे. या कलेची मुहूर्तमेढ स्वर्गीय यशवंत गीध यांनी रोवली. त्यांनी सुरू केलेला हा वडिलोपार्जित वारसा त्यांचे पुत्र पुरुषोत्तम गीध यांनी समर्थपणे पुढे नेला. त्यांनी वयाच्या ७५व्या वर्षीही त्याच जिद्दीने आणि उत्साहाने ही कला जपली आहे. आता त्यांचे पुत्र वैभव गीध हे समर्थपणे पुढे नेत आहेत.

गेली अनेक वर्षे शाडू मातीच्या मूर्ती घडवणाऱ्या वैभव गीध यांनी मागील वर्षी पुठ्ठ्याचा लगदा आणि शाडूची माती एकत्र करून प्रथम स्वतःसाठी एक गणेशमूर्ती बनवली होती. तिचे फिनिशिंग, वजनाचा हलकेपणा आणि टिकाऊपणा यामुळे त्यांनी यावर्षी ग्राहकांनाही अशाच मूर्ती देण्याचे ठरवले. त्यांच्या या उपक्रमाला भाविकांनी प्रचंड दाद दिली असून, चक्क ७५० गणेशभक्तांनी त्यांच्याकडून या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती बुक केल्या आहेत. आकर्षक मूर्ती, त्यावर केलेले चांगले रंगकाम आणि डोळ्यांची सुंदर आखणी यामुळे त्यांच्या गणेशमूर्तींना रसायनीसह पनवेल, पेण, कर्जत, खोपोली आणि मुंबईत जोरदार मागणी आहे. दरवर्षी दसऱ्यापासून गणेशमूर्ती घडविण्याचे काम सुरू होते. सुमारे ६० टक्के शाडू माती आणि ४० टक्के पुठ्ठ्याच्या लगद्याचा वापर करून दोन इंचांपासून चार फूट उंचीपर्यंतच्या विविध आकारांच्या मूर्ती पूर्णपणे हाताने तयार केल्या जातात.



> **शाडू मातीच्या गणेशमूर्तींना दरवर्षी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद मिळत आहे. पर्यावरण संवर्धनाबाबत नागरिकांमध्ये जागृती वाढत असल्याने यावर्षी शाडूची माती आणि पुठ्ठ्याचा लगदा मिक्स करून बनविलेल्या गणेश मूर्तींना चांगली मागणी आहे. आमच्या कुटुंबाने शतकभर जपलेली ही परंपरा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न असून, गणेशभक्तांचा मिळणारा विश्वास आणि प्रेम हीच आमच्या कलेची खरी पोच पावती आहे.**
> **– वैभव गीध, मूर्तीकार**

कृषीवल
। रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
। RGD/016/2026-2028



# सुबह हो गई मामू

जंतरमंतरवरच्या विजयामुळे प्रचंड उलथापालथ झालेली नाही. पण भविष्यातल्या उलथापालथीची बीजे नक्कीच रोवली गेली आहेत. शनिवारी २५ जुलैला धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा आल्यामुळे देशातील राजवट बदललेली नाही. सत्तेची किंवा समाजाची रचनाही बदललेली नाही. पण ही सत्ता आणि समाज ज्यांच्या आधाराने उभा असतो त्या सामान्य लोकांमध्ये मोठा बदल झाला आहे. कितीही प्रचंड सत्ता असली तरी आपण तिला झुकवू शकतो याचा साक्षात्कार शनिवारी भारतीय जनतेला झाला असेल. गेली बारा वर्षे आपली विचारशक्ती मोदी आणि भाजपच्या पिंजऱ्यात अडकून पडली होती याचीही जाणीव लोकांना झाली असेल.प्रश्न मुंबई-पुण्यात पाणी तुंबण्याचा असो, कोरोनामध्ये लोकांना उपचार मिळण्याचा किंवा शेतमालाला भाव मिळण्याचा. गोष्टी सरकारच्या विरोधात जायला लागल्या की त्यांना हिंदू विरुध्द मुस्लिम असा रंग दिला जात असे. आणि जनताही त्या चक्रात अडकून पुन्हा पुन्हा सरकारच्या पायाशी लोळण घेत असे. हे पारतंत्र्य, ही लाचारी, हा आंधळा मूर्खपणा जेन झीच्या जंतरमंतरवरील आंदोलनाने संपवला आहे. आंदोलन संपवताना, सुबह हो गई मामू अशा शब्दात अभिजित दीपके याने थेट नरेंद्र मोदींना आवाज दिला. प्रधान यांचा राजीनामा घेऊन हा मामू थोडाफार जागा झाला आहे. तो भानावर आला आहे का हे काही दिवसांनी कळेल. पण मोदींसाठीची ही ललकारी सर्व समाजालाही लागू आहे. जेन झीच्या पलिकडे पसरलेल्या विशाल समाजानेही आता जागे होण्याची गरज आहे. मोदींच्या म ोहनिद्रेतून बाहेर येणे आवश्यक आहे. हे मनमोहनसिंगांचे सरकार नाही, मोदींच्या सरकारात राजीनामे होत नसतात असा उद्दाम जबाब राजनाथ सिंग यांनी २०१५ साली एका पत्रकाराला दिला होता. गेली अकरा वर्षे हा उद्दामपणा चालू राहिला. तो जेन झीने अवघ्या काही दिवसात मोडून काढला. कॉकरोच जनता पार्टीची स्थापना १६ मे रोजी झाली. त्यानंतर अवघ्या दोन महिन्यांमध्ये त्यांनी मोदी सरकारला गुढगे टेकायला लावले.

### मोदींच्या पतनाचा पाया

अभिजित दीपके हा काही थोर वक्ता नाही. राजकीय विचारवंत वगैरे नाही. सरन्यायाधीशांनी बेकार तरुणांना झुरळे म्हटल्याच्या चिडीमधून त्याने होय आम्ही झुरळे असे म्हटले. आता या झुरळांनी जे करून दाखवले ते मोदींचे सरकार, प्रशासन, पोलिस आणि सरन्यायाधीशांच्या अखत्यारीत येणारी न्यायसंस्था अशा सगळ्यांच्या डोळ्यात अंजन घालणारे आहे. प्रधानांचा राजीनामा ही एक बाब झाली. पण त्यापूर्वी नीट परीक्षा घेणाऱ्या नॅशनल टेस्टिंग एजन्सीतील ४७ अधिकाऱ्यांची हकालपट्टी, पेपर फोडणाऱ्यांना १० वर्षे शिक्षा करणारा कायदा असे अनेक निर्णय झाले. आंदोलन नसते तर ते झाले नसते. उलट पेपरफुटीचे एकूणच प्रकरण दाबून टाकले गेले असते. अर्थात, प्रधानांचा राजीनामा हा नाइलाजाने आलेला आहे हेही लक्षात ठेवायला हवे. आंदोलक पेपरफुटीबाबत नैतिक जबाबदारी घेण्याची किंवा त्याबद्दल प्रायश्चित्त घेण्याची मागणी करीत होते. अकाउंटेबिलिटी हा त्यांचा मुख्य मुद्दा होता. सरकारने तो मानला आहे असे नव्हे. आंदोलकांनी सरकारची कोंडी केली. आंदोलन देशभर पसरण्याची आणि त्यातून आणखी आंदोलने उभी राहण्याची शक्यता निर्माण झाली. याला घाबरून मोदी सरकारने तूर्तास तडजोड केलेली आहे. शेतकऱ्यांच्या मागण्या मान्य करताना मोदींनी मेरी तपस्या मे कोई कमी रह गई होगी अशी भाषा केली होती. तीच भाषा धर्मेंद्र प्रधान यांनी आपल्या राजीनाम्याच्या पत्रात केली आहे. शिवाय त्यांनी पद सोडल्यानंतर भाजपच्या अनेक नेत्यांनी प्रधान हे कसे महान मंत्री व नेते आहेत अशी स्तुतीसुमने उधळली आहेत. त्यामुळे मोदी सरकारला आपल्या पापांची जाणीव झाली व त्यांनी प्रायश्चित्त घेतले असे घडलेले नाही. पण यामधूनच मोदी सरकारच्या पतनाचा पाया घातला गेला आहे. जेन झी किंवा हे आंदोलक हे मोदींना पाठिंबा देणाऱ्या घरांमधून आणि मध्यमवर्गातून येतात. ते हिंदुत्व आणि मोदी यांच्या बकवासाला किती उबले आहेत हे जंतरमंतरवरील अनेक पोस्टर्स, मीम्स, घोषणा इत्यादींमधून दिसले. हे करताना या पिढीने मोदींची तुपकट भाषाही पार मोडीत काढली. अनेकदा पचणार नाहीत अशा शिव्या दिल्या. हा संताप आणि हा मूलभूत बदल लक्षात न घेता मोदींनी सत्ता वाचवण्यासाठी तात्पुरती तडजोड म्हणून प्रधानांचा बळी दिला. पण आता हे इथे थांबणार नाही.

### इस थप्पड की गूंज....

झुरळ मंडळींना आंदोलनाचा कोणताही अनुभव नव्हता. त्यांचे कोणतेही एक संघटन नव्हते. तरीही त्यांनी आंदोलन भरकटू दिले नाही. कोठेही हिंसाचार होणार नाही याची काळजी घेतली गेली. सरकारला कारवाई करण्यासाठी एकही निमित्त मिळू दिले गेले नाही. नंतर सरकारशी चर्चा करताना त्यांनी बाणेदारपणा दाखवला. नड्डांनी सत्तेचा माज दाखवत पहिल्या भेटीच्या वेळी आंदोलकांना दोन तास बसवून ठेवले. त्यामुळे दुसऱ्यांदा आम्ही नड्डांना त्यांच्या कार्यालयात भेटायला जाणार नाही असे आंदोलकांनी जाहीर केले. नड्डांचा माज एका झटक्यात उतरला. पुढच्या दोन भेटी त्रयस्थ ठिकाणी झाल्या. यातही पहिल्या बैठकीत प्रधानांचा राजीनामा शक्यच नाही असे म्हणणारे चोवीस तासांच्या आता राजीनामा झाला आहे ही बातमी घेऊनच दुसऱ्या बैठकीला आले. आंदोलकांवरील गुन्हे मागे घेणे व नुकसानभरपाई यांच्या मागण्याही मान्य झाल्या. यातील गुन्हे मागे घेण्याच्या बाबतीत सरकार लबाडी करण्याची शक्यता आहे. याबाबत अगदी लेखी आश्वासन दिले तरी ते प्रत्यक्षात उतरण्यास बराच कालावधी जातो. मराठा आंदोलनातील गुन्हे मागे घेण्याबाबतचा अनुभव ताजा आहे. मुंबईत शेतकरी कामगार पक्षाच्या साम्या कोरडे व इतरांवर पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. हे सर्व जण शांततेने आंदोलन करीत होते. असे करण्याचा हक्क त्यांना राज्यघटनेनेच दिला आहे. पण तो पायदळी तुडवण्याचा प्रयत्न फडणवीसांच्या पोलिसांनी केला. आता त्यांनाही शहाणपण येईल आणि गुन्हे मागे घेण्याची लगोलग अंमलबजावणी होईल अशी अपेक्षा आहे. अन्यथा, जेन झीला याबाबतही सरकारला तडाखा द्यावा लागेल. किंबहुना, दिल्लीतील आंदोलनामध्ये पोलिसांनी जी दडपशाही केली त्याचा स्वतंत्र पंचनामा करण्याची आवश्यकता आहे. पोलिसांनी शांततेने उभ्या असणाऱ्यांवर बेछूट लाठीमार केला. इतकेच काय पण छऱ्यांच्या बंदुका किंवा पॅलेट गन वापरल्या. हे छर्रे लागून काश्मिरात अनेकांना अंधत्व आले होते. यांचा वापर नागरी आंदोलनात बेकायदा आहे. तरीही अमित शहा यांच्या पोलिसांनी तो केला. याबद्दल शहा यांची जबाबदारी निश्चित करण्याची वेळ आली आहे. गेली बारा वर्षे शहा यांच्या सीबीआय, ईडी इत्यादींचा नंगानाच या देशात चालू आहे. त्याचा हिशेब करण्याची वेळ आली आहे. आंदोलक व विरोधी पक्ष तो करतील अशी आशा आहे. या आंदोलनामुळे काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांनाही आता बळ मिळाले असेल. गेली अनेक वर्षे राफेल, नोटबंदी, निवडणुकीच्या बेकायदा देणग्या अशा मुद्द्यांवर या राजवटीची पापे लोकांसमोर मांडण्याचा ते प्रयत्न करीत आहेत. पण जनतेतील एका मोठ्या वर्गाच्या कानावर हा आवाज पडत नव्हता. आता त्यांच्याच घरांमधील पुढच्या पिढीने सरकारच्या आणि आपल्याच आईबापांच्या कानाखाली एक आवाज काढला आहे. इस थप्पड की गूंज बहुत देर और दूर तक सुनाई देगी.

## विचार

# देशभर 'लाडक्या बहिणीं'वर ताशेरे

> *'लाडक्या बहिणीं'ना थेट रोख अनुदान देणाऱ्या योजना समाजातील दुर्बल घटकांना आधार देणाऱ्या असल्या, तरी आर्थिकदृष्ट्या टिकाऊ आणि पारदर्शक असणे आवश्यक आहे. 'कॅग'ने उपस्थित केलेले प्रश्न केवळ लेखापरीक्षणापुरते मर्यादित नाहीत, तर ते राज्याच्या वित्तीय आरोग्याशी, सार्वजनिक पैशाच्या जबाबदार वापराशी आणि भविष्यातील विकासाशी संबंधित आहेत.*



**डॉ. सुकृत खांडेकर**

मध्य प्रदेश, कर्नाटक, तेलंगणा, पश्चिम बंगाल, दिल्लीसह अनेक राज्यांनी महिलांसाठी रोख आर्थिक मदतीच्या योजना सुरू केल्या आहेत. 'कॅग'ने विविध राज्यांच्या आर्थिक स्थितीचे परीक्षण करताना अशा योजनांमुळे महसुली खर्चात मोठी वाढ होत असून भांडवली गुंतवणुकीवर परिणाम होत असल्याचा इशारा दिला आहे. त्यामुळे प्रश्न केवळ एका योजनेचा नसून देशातील वाढत्या 'फ्रीबीज' राजकारणाचा आहे. महाराष्ट्रातील 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजना ही महायुती सरकारची सर्वाधिक चर्चेत राहिलेली आणि राजकीयदृष्ट्या प्रभावी ठरलेली योजना आहे. विधानसभा निवडणुकीपूर्वी सुरू झालेल्या या योजनेमुळे लाखो महिलांना थेट आर्थिक मदत मिळाली आणि त्याचा राजकीय फायदाही सत्ताधाऱ्यांना झाला; मात्र निवडणुकीनंतर या योजनेची दुसरी बाजू समोर येऊ लागली आहे. नियंत्रक आणि महालेखापरीक्षकांनी (कॅग) या योजनेच्या अंमलबजावणीवर गंभीर आक्षेप घेतले आहेत. विशेषतः सुमारे साडेतीन हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त खर्च, लाभार्थींच्या पडताळणीतील त्रुटी आणि राज्याच्या तिजोरीवर पडणारा वाढता भार यामुळे ही योजना आता आर्थिक शाश्वततेच्या कसोटीवर उभी आहे. हे चित्र केवळ महाराष्ट्रापुरते मर्यादित नाही. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाची गरज कोणीही नाकारू शकत नाही. ग्रामीण भागातील अनेक महिलांना स्वतःच्या नावाने उत्पन्न नसते. अशा परिस्थितीत दरमहा मिळणारी आर्थिक मदत त्यांच्यासाठी आधार ठरते. घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य, बचत यासाठी या पैशांचा उपयोग होत असल्याची अनेक उदाहरणे आहेत; मात्र प्रश्न असा आहे, की या योजनांचा उद्देश खरोखर आर्थिक सक्षमीकरण आहे, की निवडणुकीपूर्वी म तदारांवर प्रभाव टाकण्याचे राजकीय साधन?

वस्तुतः योजना केवळ रोख रक्कम वाटण्यापुरतीच मर्यादित राहिली आणि त्यातून रोजगार, कौशल्यविकास किंवा उत्पन्ननिर्मिती झाली नाही, तर ती दीर्घकालीन विकासाऐवजी महसुली खर्च वाढवणारी योजना ठरते. 'कॅग'ने योजनेबाबत केलेली निरीक्षणे धक्कादायक मानली जात आहेत. लाभार्थींची योग्य पडताळणी न करता मोठ्या प्रमाणात नोंदणी करण्यात आल्याने पात्रतेच्या निकषांवर प्रश्न उपस्थित झाले. अनेक लाभार्थींच्या उत्पन्नाची, कर भरण्याची, सरकारी नोकरीची किंवा इतर योजनांतील लाभांची पुरेशी तपासणी झालेली नव्हती. 'कॅग'च्या निरीक्षणानुसार यामुळे सुमारे ९२ लाख लाभार्थींवर साडेतीन हजार कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार राज्यावर पडल्याचे नमूद करण्यात आले आहे. इतक्या मोठ्या खर्चासाठी आवश्यक आर्थिक नियोजन आणि निधीचे स्रोत याबाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत. सरकारने योजना सुरू करताना जलद अंमलबजावणीवर भर दिला; मात्र त्यासाठी आवश्यक डेटा पडताळणी, तांत्रिक प्रणाली आणि विविध विभागांतील माहितीची सांगड घालण्यात अनेक त्रुटी राहिल्या. परिणामी अपात्र लाभार्थीही योजनेत शिरल्या. योजनेच्या सुरुवातीपासूनच अनेक प्रकारच्या तक्रारी समोर आल्या. काही ठिकाणी बनावट कागदपत्रांच्या आधारे अर्ज भरले गेले. काही प्रकरणांमध्ये उत्पन्नाची चुकीची माहिती देण्यात आली. काही लाभार्थींची नावे एकापेक्षा अधिक ठिकाणी असल्याचे निदर्शनास आले. मृत व्यक्तींच्या नावावर लाभ मिळाल्याच्या तक्रारीही काही जिल्ह्यांमध्ये समोर आल्या. काही ठिकाणी दलालांनी अर्ज भरण्यासाठी पैसे घेतल्याच्या तक्रारी झाल्या.

एकंदरीत, या धाटणीच्या योजनांमध्ये ऑनलाइन प्रक्रियेतील अडचणींचा फायदा घेऊन नागरिकांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. यामुळे प्रशासनाला नंतर मोठ्या प्रमाणावर पडताळणी मोहीम राबवावी लागली. सरकारने काही अपात्र लाभार्थींची नावे वगळण्याची प्रक्रिया सुरू केली असली, तरी प्रारंभीच्या त्रुटींम ुळे सार्वजनिक निधीचा मोठा वापर झाल्याची टीका कायम आहे. आज देशातील बहुतेक राज्यांच्या डोक्यावर मोठ्या प्रमाणात कर्जही आहे. पायाभूत सुविधा, सिंचन, शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, शहरी विकास यासाठी प्रचंड गुंतवणुकीची गरज आहे. अशा परिस्थितीत दरमहा हजारो कोटी रुपये थेट रोख मदतीवर खर्च करणे म्हणजे महसुली खर्चात सातत्याने वाढ होणे. महसुली खर्च वाढल्यास भांडवली खर्चासाठी उपलब्ध निधी कमी होतो. म्हणजेच नवीन रस्ते, पूल, मेट्रो, रुग्णालये, शाळा, जलसंधारण प्रकल्प अशा विकासकामांवर परिणाम होऊ शकतो. अर्थतज्ज्ञांच्या मते, सामाजिक योजनांची गरज असली, तरी त्या राज्याच्या उत्पन्नाशी सुसंगत असणे आवश्यक आहे. अन्यथा, भविष्यात अधिक कर्ज घेण्याची वेळ येते आणि त्यावरील व्याजाचा भारही वाढत जातो. मध्य प्रदेशमधील 'लाडली बहना', कर्नाटकमधील 'गृहलक्ष्मी', तेलंगणामधील महिला सहाय्य योजना, पश्चिम बंगालची 'लक्ष्मी भांडार' अशा अनेक योजनांवर दरवर्षी हजारो कोटी रुपये खर्च होत आहेत. काही राज्यांमध्ये या योजनांमुळे महसुली तूट वाढल्याची नोंद विविध आर्थिक अहवालांमधून करण्यात आली आहे.

'कॅग'ने अशा योजनांचा आढावा घेताना अनेक राज्यांना आर्थिक शिस्त राखण्याचा सल्ला दिला आहे. महसुली उत्पन्नात पुरेशी वाढ न करता कायमस्वरूपी रोख मदतीच्या योजना सुरू ठेवल्यास भविष्यात वित्तीय स्थैर्यावर परिणाम होऊ शकतो, असा इशारा देण्यात आला आहे. महिलांना आर्थिक मदत देणे चुकीचे नाही. उलट, अनेक महिलांना त्याचा थेट फायदा होत आहे; परंतु दीर्घकालीन दृष्टीने विचार केला तर केवळ रोख रक्कम देण्यापेक्षा महिलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनवणाऱ्या योजनांवर अधिक भर देणे आवश्यक आहे. कौशल्यविकास, स्वयंरोजगार, सूक्ष्म उद्योग, बचत गट, डिजिटल उद्योजकता, कृषी प्रक्रिया उद्योग, व्याजमुक्त कर्ज, विपणन सुविधा, रोजगारनिर्मिती यांसारख्या उपक्रम ांमध्ये गुंतवणूक केल्यास महिलांचे उत्पन्न कायम स्वरूपी वाढू शकते. त्यामुळे सरकारी मदतीवरील अवलंबित्व कमी होईल. आज जवळपास प्रत्येक निवडणुकीपूर्वी एखादी नवीन रोख मदत योजना जाहीर केली जाते. एक राज्य योजना आणते आणि दुसरे राज्य त्यापेक्षा अधिक रक्कम जाहीर करते. त्या त्या राज्यातले विरोधी पक्ष तर सत्तेत आल्यास सत्ताधाऱ्यांपेक्षा अधिक रक्कम या योजनेद्वारे देण्याचे आश्वासन देतात. परिणामी, सामाजिक कल्याणापेक्षा राजकीय स्पर्धा अधिक तीव्र होत असल्याचे दिसते. याचा परिणाम असा होतो, की राज्यांच्या अर्थसंकल्पातील मोठा हिस्सा नियमित रोख हस्तांतरणावर खर्च होऊ लागतो. भविष्यात ही स्पर्धा आणखी वाढल्यास वित्तीय शिस्त राखणे अधिक कठीण होईल. लाडक्या बहिणींसारख्या योजनांचे उद्दिष्ट समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल महिलांना आधार देणे हेच असले पाहिजे. त्यासाठी काही मूलभूत सुधारणा आवश्यक आहेत.

सर्वप्रथम लाभार्थींची डिजिटल आणि बहुपातळी पडताळणी अनिवार्य केली पाहिजे. प्राप्तिकर, मालमत्ता, सरकारी नोकरी, इतर योजनांमधील लाभ यांचा डेटा एकत्रित करून पात्रता निश्चित करणे आवश्यक आहे. अपात्र लाभार्थींना त्वरित वगळण्याची पारदर्शक यंत्रणा असावी. दुसरे म्हणजे अशा योजनांचे दरवर्षी स्वतंत्र सामाजिक आणि आर्थिक लेखापरीक्षण झाले पाहिजे. लाभार्थींच्या जीवनमानात प्रत्यक्ष सुधारणा झाली का, याचे मोजमाप झाले पाहिजे. तिसरे म्हणजे या योजनांना कौशल्य प्रशिक्षण, स्वयंरोजगार आणि आर्थिक सक्षमीकरणाशी जोडले पाहिजे. महिलांना कायम स्वरूपी उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे हेच खरे सक्षमीकरण ठरेल. अशा योजना समाजातील दुर्बल घटकांना आधार देणाऱ्या असल्या, तरी त्या आर्थिकदृष्ट्या टिकाऊ आणि पारदर्शक असणेही तितकेच आवश्यक आहे.

'कॅग'ने उपस्थित केलेले प्रश्न केवळ लेखापरीक्षणापुरते मर्यादित नाहीत, तर राज्याच्या वित्तीय आरोग्याशी, सार्वजनिक पैशाच्या जबाबदार वापराशी आणि भविष्यातील विकासाशी संबंधित आहेत. लोककल्याणकारी योजना आणि आर्थिक शिस्त यांचा समतोल राखणे ही कोणत्याही सरकारपुढील सर्वात मोठी परीक्षा असते. महिलांचे सक्षमीकरण हे निश्चितच प्राधान्य असले पाहिजे; परंतु ते केवळ रोख मदतीवर आधारित न राहता रोजगार, उत्पन्ननिर्मिती, शिक्षण आणि कौशल्यविकासाशी जोडले गेले, तरच या योजना खऱ्या अर्थाने समाजपरिवर्तनाचे साधन ठरतील. अन्यथा, अल्पकालीन राजकीय लाभासाठी सुरू झालेल्या योजना भविष्यात राज्याच्या अर्थकारणावर दीर्घकालीन ओझे बनण्याचा धोका कायम राहील.

## चर्चा आजची

# शाब्बास तरुणांनो! दिल्लीचे तख्त हादरवलेत!

**राकेश लोहार**

देशातील विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळणाऱ्या पेपर फुटीच्या प्रश्नावर अखेर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तोंड उघडावे लागले, हीच मुळात आजच्या संतप्त तरुणाईच्या आंदोलनाची ताकद आहे. अन्यथा विद्यार्थ्यांच्या डोळ्यातील अश्रू, पालकांच्या काळजातील धग आणि बेरोजगार तरुणांच्या संतापाची भाषा दिल्लीच्या सत्ताधाऱ्यांना कधी ऐकू आली असती? ज्यांनी वर्षानुवर्षे प्रश्नांकडे पाठ फिरवली, त्यांना अखेर रस्त्यावर उतरलेल्या तरुणांनी दिल्लीच्या तख्तापर्यंत आपला आवाज पोहोचवून हादरवून सोडले. आणि, शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांना पेपरफुटीची नैतिक जबाबदारी स्वीकारुन उशिरा का होईना, राजीनामा द्यावाच लागला. तरुणाई एकवटली तर काय करु शकते, याचा जणू ट्रेलरच सरकारला पाहावयास मिळाला. कारण, ट्रेलर यासाठीच की, तरुणाईच्याच भाषेत पिक्चर अभी बाकी हैं! काहीही असो; पण, सरकारला एक पाऊल मागे येत झुकावेच लागले, हेही नसे थोडके!

पेपरफुटी ही केवळ परीक्षा व्यवस्थेतील एखादी चूक नाही; ती लाखो विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर, त्यांच्या स्वप्नांवर आणि त्यांच्या पालकांच्या आयुष्यभराच्या कष्टावर घाला आहे. एक विद्यार्थी वर्षानुवर्षे अभ्यास करतो, आई-वडील आपल्या मुलाच्या शिक्षणासाठी पोटाला चिमटा काढतात, आणि परीक्षा केंद्राच्या दारात पोहोचल्यावर पेपर फुटल्याची बातमी समोर येते. त्या क्षणी फक्त प्रश्नपत्रिका फुटत नाही; एका कुटुंबाचे स्वप्न फुटते, एका तरुणाची आशा फुटते आणि व्यवस्थेवरील विश्वासही चक्काचूर होतो. म्हणूनच आज रस्त्यावर उतरलेल्या तरुणाईला सलाम करावा लागेल. शाब्बास तरुणांनो! तुमच्या आवाजाने दिल्लीच्या सत्तेच्या भिंती हादरल्या आहेत. जंतर-मंतरपासून देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत उमटणाऱ्या संतापाच्या लाटेने अखेर सत्तेच्या कानावर हात ठेवायला भाग पाडले. आपल्या जीवाची पर्वा न करता ही तरुणाई जणू प्राण गेले तरी बेहत्तर, पण मागे हटली नाही. कारण, त्यांना हवी होती, शिक्षणव्यवस्थेतील सुधारणा, पेपरफुटीसारखा कलंक कायमचा मिटवायचा होता.

मोदी सरकारच्या काळात पेपरफुटीच्या घटनांचा मोठा प्रश्न निर्माण झाला असल्याचा आरोप विद्यार्थी सातत्याने करीत आहेत. याच प्रश्नावर मागील अनेक वर्षांत कठोर




आणि ठोस कारवाई का झाली नाही, हा सवाल आज प्रत्येक विद्यार्थी आणि पालक विचारत आहे. एक-दोन घटना म्हणून हा विषय झटकून टाकण्याचा हा प्रश्न नाही. प्रश्न आहे तो देशाच्या तरुणाईच्या भवितव्याचा!

आणि आता, जनक्षोभ वाढल्यानंतर पंतप्रधानांकडून कठोर कारवाईची भाषा केली जाते. दोषींना शिक्षा, जलदगती न्यायालये, विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य अशा घोषणा केल्या जातात. पण, सवाल साधा आहे की, हा आवाज आधी का उठला नाही? विद्यार्थ्यांना रस्त्यावर उतरावे लागले, पोलिसांच्या लाठ्या खाव्या लागल्या, आंदोलन पेटावे लागले आणि देशभर संतापाची ठिणगी उडावी लागली, तेव्हाच दिल्लीला विद्यार्थ्यांचे भविष्य आठवले का? आज तरुणाईला केवळ आश्वासन नको आहे. तिला उत्तर हवे आहे. जबाबदारी निश्चित हवी आहे. दोषींवर कारवाई हवी आहे. आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे परीक्षा व्यवस्थेतला भ्रष्टाचार मुळापासून उखडून टाकण्याची हमी कृतीतून हवी आहे.

पेपरफुटीच्या प्रत्येक प्रकरणानंतर चौकशीची घोषणा, समित्या, आश्वासने आणि पुन्हा शांतताहा खेळ आता बंद झाला पाहिजे. कारण, हा खेळ सत्ताधाऱ्यांच्या कार्यालयात चालत असला तरी त्याची किंमत विद्यार्थी आणि त्यांचे पालक मोजत आहेत. ज्यांच्या हातात पुस्तक असायला हवे, त्यांच्या हातात आंदोलनाचे फलक का आले? ज्यांच्या डोळ्यांत भविष्याची स्वप्ने असायला हवीत, त्या डोळ्यांत संतापाची आग का पेटली? हा प्रश्न सरकारने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे.

आंदोलनकर्त्या तरुणांनी एक गोष्ट स्पष्ट करून दाखवली आहे की, सत्ता कितीही मोठी असली, दिल्लीचे तख्त कितीही अभेद्य वाटले तरी जनतेचा आवाज त्यापेक्षा मोठा असतो. कालपर्यंत ज्यांना वाटत होते की, घोषणा करून, समाजमाध्यमांवर संदेश टाकून किंवा काही गोड शब्द बोलून प्रश्न संपवता येईल, त्यांना तरुणाईने आता स्पष्ट उत्तर दिले आहे; आम्हाला आश्वासने नकोत, कृती हवीया!

पेपरफुटीच्या प्रश्नावर सरकारने खरोखरच कठोर भूमिका घ्यायची असेल, तर ती केवळ भाषणात नव्हे तर निर्णयांत दिसली पाहिजे. जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. दोषींना राजकीय आश्रय मिळणार नाही, याची खात्री झाली पाहिजे. तपास पारदर्शक झाला पाहिजे. आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, पुढील पिढीचा परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण झाला पाहिजे.

तरुणाईचा हा एल्गार केवळ एका परीक्षेचा प्रश्न नाही. हा त्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. हा त्यांच्या कष्टाच्या सन्मानाचा प्रश्न आहे. हा त्यांच्या स्वप्नांच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. म्हणूनच आजच्या या लढ्याला सलाम! बारा वर्षे 'मन की बात' करणाऱ्यांना एक दिवस तरी 'जन की बात' ऐकायला लावलीत. सत्तेच्या बंद दरवाजांवर तुमच्या आवाजाने अशी टकटक केली आहे की, आता ते दरवाजे उघडल्याशिवाय पर्याय नाही. पण, लक्षात ठेवा; मौनभंग झाला म्हणजे लढा संपला नाही. आश्वासन मिळाले म्हणजे विजय झाला नाही. खरा विजय तेव्हाच, जेव्हा पेपरफुटीला आळा बसेल, दोषींवर कठोर कारवाई होईल आणि देशातील प्रत्येक विद्यार्थ्याला आपल्या मेहनतीवर आणि परीक्षेच्या व्यवस्थेवर पुन्हा विश्वास ठेवता येईल. तोपर्यंत हा आवाज थांबता कामा नये. कारण, तरुणाई जागी झाली आहे; प्रश्न विचारू लागली आहे. आणि, विचारलेल्या प्रश्नांवर यापुढे चर्चा आणि संवाद व्हायलाच हवेत, हेच आज तरुणाईने दिल्लीच्या तख्ताला दाखवून दिले आहे.

## लोकसंसद

### गौतम बुद्धांची पवित्र भूमी सारनाथला जागतिक वारसा!

दक्षिण कोरियातील बुसान येथे १९ जुलै ते २९ जुलै २०२६ या कालावधीत पार पडत असलेल्या जागतिक वारसा समितीच्या ४८ व्या अधिवेशनात उत्तर प्रदेशातील वाराणसी नजीकचे 'सारनाथ' हे प्राचीन पवित्र बौद्ध स्थळ अधिकृतपणे भारताचे ४५ वे युनेस्को जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित करण्यात आले. लुंबिनी (नेपाळ) आणि बोधगया (बिहार) येथील महाबोधी मंदिर यांच्यानंतर 'जागतिक वारसा' दर्जा प्राप्त करणारे सारनाथ हे बौद्ध धर्माच्या चार प्रमुख जागतिक तीर्थक्षेत्रांपैकी तिसरे स्थळ ठरले आहे. भगवान गौतम बुद्धांनी आपले पहिले प्रवचन (धम्मचक्रप्रवर्तन) याच भूमीवर दिले होते. त्यामुळे संपूर्ण जगासाठी हे स्थान शांतता आणि करुणेचे प्रतीक बनले आहे. येथील धमेख स्तूप आणि आपल्या देशाची ओळख असलेल्या अशोक स्तंभाच्या शीर्षभागावर असलेले चार सिंह हे आज स्वतंत्र भारताची राष्ट्रीय राजमुद्रा असून या स्तंभावरील २४ आऱ्यांचे 'अशोक चक्र' भारताच्या राष्ट्रीय ध्वजाच्या मध्यभागी विराजमान आहे. ऐतिहासिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि आध्यात्मि क तसेच राष्ट्रीय असे अनन्यसाधारण महत्त्व असलेल्या सारनाथला जागतिक वारसा स्थळांच्या यादीत स्थान मिळाल्यामुळे भारतात परदेशी पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढेल आणि स्थानिक पातळीवर रोजगार आणि अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे,** अंधेरी

## दिनविशेष

# डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम : क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक

भारताच्या क्षेपणास्त्र प्रणालीचे जनक, जेष्ठ शास्त्रज्ञ आणि भारताचे माजी राष्ट्रपती भारतरत्न डॉ. ए. पी. जे अब्दुल कलाम यांची आज अकरावी पुण्यतिथी. १५ ऑक्टोबर १९३१ रोजी तामिळनाडूतील रामेश्वरम येथे त्यांचा जन्म झाला. त्यांचे पूर्ण नाव अबुल पाकिर जैनूलाबदिन अब्दुल कलाम असे होते. अब्दुल कलाम यांचे वडील नावाडी होते. रामेश्वरमला येणाऱ्या यात्रेकरूंना होडीने धनुष्यकोडीला नेण्याआणण्याचे काम ते करीत. अब्दुल कलाम शाळेत असतानाच त्यांच्या वडिलांचे निधन झाले. घरची परिस्थिती अत्यंत गरिबीची असल्याने ते गावात वर्तमानपत्र विकू लागले. त्यांचे बालपण काबाडकष्ट करण्यातच गेले. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर ते उच्च शिक्षणासाठी तिरुचिरापल्ली येथील सेंट जोसेफ कॉलेजमध्ये दाखल झाले. तेथे बीएससी झाल्यानंतर त्यांनी मद्रास इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीत प्रवेश घेतला. प्रवेशासाठी त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांच्या बहिणीने दागिने गहाण ठेवून त्यांना पैसे दिले. या संस्थेतून एरोनॉटिक्सचा डिप्लोमा पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील नासा संस्थेत चार महिने एरोस्पेस टेक्नॉलॉजीचे प्रशिक्षण घेतले. भारतात आल्यावर त्यांनी सहा वर्ष डीआरडीओमध्ये शास्त्रज्ञ म्हणून काम केले. १९६३ पासून ते इसरो संस्थेत क्षेपणास्त्र विकासातील एसएलव्ही (सॅटेलाईट लाँचिंग व्हेईकल ) संशोधनात भाग घेऊ लागले. पुढे ते या प्रकल्पाचे प्रमुख बनले. इसरोचे तत्कालीन प्रमुख विक्रम साराभाई हे अब्दुल कलाम यांच्या कार्याने प्रभावित झाले. विक्रम साराभाई व अब्दुल कलाम यांच्यात गुरू शिष्याचे नाते निर्माण झाले. विक्रम साराभाई यांनी भारतात विज्ञान तंत्रज्ञानाची आघाडी डॉ कलाम यांनी सांभाळावी असे वक्तव्य केले होते, ते पुढे कलामांनी सार्थ करून दाखवले. पुढे साराभाई यांचेच नाव दिलेल्या विक्रम साराभाई अवकाश केंद्राचे ते प्रमुख बनले. इंदिरा गांधी पंतप्रधान असताना भारताने क्षेपणास्त्र विकासाचा एकात्मिक कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमाच्या प्रमुखपदी अब्दुल कलाम यांची नेमणूक करण्यात आली त्यामुळे ते पुन्हा डीआरडीओत दाखल झाले. तिथे स्वदेशी बनावटीचे क्षेपणास्त्र तयार करण्याचे शिवधनुष्य त्यांनी लीलया पेलले. डीआरडीओत देशातील नामवंत शास्त्रज्ञांचा संच त्यांच्याकडे होता. वैयक्तिक कामगिरीपेक्षा सांघिक कामगिरीवर त्यांचा भर असायचा. देशातील उत्तम शास्त्रज्ञांकडून सर्वोत्तम कामगिरी करून घेण्याची कला त्यांच्याकडे होती. विज्ञानाचे परमभोक्ता असणारे अब्दुल कलाम मनाने खूप संवेदनशील व साधे होते. त्यांना रुद्रविना वाजवण्याचा आणि मुलांशी गप्पा मारण्याचा छंद होता. भारत सरकारने पद्मभूषण, पद्मविभूषण व १९९८ साली भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केला. डॉ कलाम हे अविवाहित व पूर्ण शाकाहारी होते. जगातील सर्वात मोठ्या लोकशाही राष्ट्राच्या राष्ट्रपतीपदी निवड झालेले डॉ अब्दुल कलाम हे तरुणांना सदैव प्रेरणा देणारे व्यक्तिमत्त्व होते. राष्ट्रपतीपदावर विराजमान झाल्यावर डॉ कलाम यांनी मुलांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन रुजविण्याचे काम केले. मोठी स्वप्ने पाहा आणि त्यासाठी भरपूर कष्ट करा असे ते तरुणांना सांगत. देशातील तरुणांवर त्यांचा खूप विश्वास होता. आपल्या देशातील तरुणांमध्ये खूप ऊर्जा आहे या ऊर्जेचा योग्य वापर केला तर देश महासत्ता बनेल असे ते नेहमी म्हणत. त्यांनी अनेक पुस्तके लिहिली. अग्निपंख, इंडिया २०-२०, इग्निटटेड माईंडस ही त्यांनी लिहिलेली पुस्तके खूप गाजली. अग्निपंख हे त्यांनी लिहिलेले पुस्तक बेस्ट सेलर ठरले. राष्ट्रपतीपदावरून निवृत्त झाल्यावर डॉ कलाम विविध संस्थांमध्ये जाऊन व्याख्याने देत असत. २७ जुलै २०१५ रोजी तरुणांना व्याख्यान देत असतानाच त्यांचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या अकाली निधनाने भारताच्या वैज्ञानिक क्षेत्रात जी पोकळी निर्माण झाली ती कधीही भरून निघणार नाही. डॉ ए.पी. जे अब्दुल कलाम यांना पुण्यतिथीनिमित्ताने विनम्र अभिवादन!

**– श्याम ठाणेदार**

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**२७ जुलै**

१) श्री.द्वारकानाथ वामन नाईक
मु.पो.आक्षी, अलिबाग
२७-०७-१९४४

२) श्रीम. लिस्सी के.एस. पुष्पगं
गोकुळेश्वर नगर, गोंधळपाडा
२७-०७-१९६१

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८
(बीपीन राठवा)
९२२६०५५१५५
(अमित शहानंद)
- मुख्य संपादक, कृषीवल

**आजचे अन्नदाते**



**श्री. डुंगरशी लालजी विसरीया, वाढदिवस अलिबाग**



**स्व. पुष्पा मनोज जैन, स्मरणार्थ अलिबाग**

# कागदपत्रांच्या कचाट्यात आदिवासी मतदार

**। पाली /बेणसे । प्रतिनिधी ।**

सुधागड तालुक्यातील दुर्गम भागात आणि वाड्या-वस्त्यांवर राहणाऱ्या अनेक आदिवासी बांधवांना मतदार यादीशी संबंधित फॉर्म भरताना आवश्यक कागदपत्रे आणि दाखले मिळवण्यात मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अपुऱ्या कागदपत्रांमुळे त्यांचे फॉर्म बाद होऊन त्यांची नावे थेट मतदार यादीतून वगळली जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



या गंभीर समस्येची दखल घेत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) सुधागड तालुकाध्यक्ष सुनील साठे यांनी नुकतीच सुधागडचे नायब तहसीलदार (निवडणूक) नकुल पोळेकर यांची भेट घेऊन त्यांना या समस्येबाबत अवगत केले व आदिवासी बांधवांना सहकार्य करण्याची मागणी केली.

सध्या निवडणूक विभागाकडून मतदार याद्या अद्ययावत करण्याचे आणि नवीन नोंदणीचे काम सुरू आहे. यासाठी प्रशासनाकडून विविध फॉर्म्स भरून घेतले जात आहेत. मात्र, सुधागड तालुक्यातील आदिवासी नागरिकांकडे प्रशासनाने घातलेल्या अटींनुसार आवश्यक असलेले जुने दाखले, वयाचे पुरावे किंवा रहिवासी कागदपत्रे सहज उपलब्ध होत नाहीत. ही कागदपत्रे वेळेत उपलब्ध न झाल्यामुळे अनेक आदिवासी बांधवांचे फॉर्म अपूर्ण राहत आहेत. निवडणूक विभागाच्या नियमांनुसार अपूर्ण कागदपत्रे असलेले फॉर्म बाद केले जातात.

याचा थेट फटका सुधागडमधील शेकडो आदिवासी बांधवांना बसणार असून, त्यांची नावे मतदार यादीतून कमी होण्याची किंवा नव्याने समाविष्ट न होण्याची शक्यता बळावली आहे. या पार्श्वभूमीवर मनसेचे सुधागड तालुकाध्यक्ष सुनील साठे यांनी थेट निवडणूक शाखेच्या नायब तहसीलदारांची त्यांच्या कार्यालयात जाऊन भेट घेतली. यावेळी झालेल्या चर्चेत साठे यांनी अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले की, आदिवासीसमाज हा मुळातच अनेक सोयी-सुविधांपासून वंचित आहे. अशातच कागदपत्रांच्या जाचक अटींमुळे ते मतदानाच्या मूलभूत अधिकाराला मुकण्याची शक्यता आहे.

### प्रशासनाने सहकार्य करण्याची मागणी

सुनील साठे यांनी प्रशासनाला विनंती केली आहे की, निवडणूक विभागाने लवकरात लवकर यावर योग्य तो सकारात्मक निर्णय घ्यावा. आदिवासी बांधवांची अडचण समजून घेत त्यांना दाखले मिळवून देण्यासाठी किंवा पर्यायी कागदपत्रे ग्राह्य धरण्यासाठी प्रशासनाने विशेष सहकार्य करावे. जेणेकरून एकाही आदिवासी बांधवाचे नाव मतदार यादीतून बाद होणार नाही.

## कोप्रोली ते श्रीक्षेत्र कार्ला एकविरा बाईक रॅलीचे आयोजन

**। उरण । प्रतिनिधी ।**

आई एकविरा मातेच्या भक्तिभावाने प्रेरित होऊन आई एकविरा मंदिर, कोप्रोली, उरण ते श्री क्षेत्र कार्ला अशी भव्य बाईक रॅलीचे आयोजन ९ ऑगस्ट रोजी करण्यात आले आहे.

उरणमध्ये पहाटे ६.३० वाजता आई एकविरा मंदिरात आरती झाल्यानंतर उरण मधून रॅलीला सुरुवात होणार आहे. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना देऊन ढोल-ताशांच्या गजरात रॅली मार्गस्थ होईल. श्री क्षेत्र कार्ला येथील आई एकवीरा मातेचे दर्शन घेतल्यानंतर आई एकवीरा मंदिर परिसराची स्वच्छता, वृक्षारोपण आणि सामाजिक उपक्रम राबविण्यात येणार असून, भक्तीबरोबरच सामाजिक बांधिलकी जपण्याचा संदेश देण्यात येणार आहे.

या भव्य बाईक रॅलीच्या आयोजनात विविध गावातील भाविकांचा सहभाग आहे. रॅलीच्या आयोजनासाठी संपूर्ण नियोजन व मार्गदर्शन संस्थापक देविचंद म्हात्रे यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांनी प्रेरित या भव्य बाईक रॅलीत शिवप्रेमी, एकवीरा भक्त आणि नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले आहे.

## वीज खांबांवरील अनधिकृत केबल्स हटवा

- **अन्यथा कायदेशीर कारवाई**
- **महावितरणचा इंटरनेट प्रदात्यांना इशारा**

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

महावितरण कंपनीच्या वीज खांबांवर, रोहित्रांवर आणि स्टे वायरवर अनधिकृतपणे टाकण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या केबल्स पुढील सात दिवसांत स्वतःच्या खर्चाने काढून घ्याव्यात, अन्यथा संबंधित मालकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा इशारा महावितरण कार्यालय, श्रीवर्धन यांच्या वतीने देण्यात आला आहे.

श्रीवर्धन परिसरात केबल टी. व्ही. ऑपरेटर, इंटरनेट सेवा प्रदाते, सीसीटीव्ही चालक व टेलिफोन कंपन्यांनी महावितरणच्या यंत्रणेचा वापर करून अनधिकृत केबल्सचे जाळे पसरवल्याचे निदर्शनास आले आहे. यामुळे वीजपुरवठ्याची देखभाल व दुरुस्ती करताना अडथळे येत असून आगीच्या घटना, विद्युत अपघात आणि मनुष्यहानीचा गंभीर धोका निर्माण झाला आहे.

महावितरणने स्पष्ट केले आहे की, हा प्रकार विद्युत अधिनियम २००३ (कलम ५३ व १६१), केंद्रीय विद्युत प्राधिकरण नियम २०२३ आणि भारतीय न्याय संहिता २०२३ अंतर्गत सार्वजनिक मालमत्तेस हानी पोहोचवणारा व दंडनीय अपराध आहे.

दिलेल्या सात दिवसांच्या मुदतीत केबल्स न हटवल्यास महावितरण कोणतीही पूर्वसूचना न देता त्या काढून टाकेल. होणाऱ्या नुकसानीस आणि खर्चास संबंधित ऑपरेटर जबाबदार राहतील. तसेच सर्व संबंधितांनी विद्युत उपकरणांपासून सुरक्षित अंतर राखावे आणि नवीन केबल्स टाकू नयेत, असे आवाहन महावितरण कार्यालय, श्रीवर्धनतर्फे करण्यात आले आहे.

## रसायनी साईबाबा मंदिरात गुरुपौर्णिमा

**रसायनी :** मोहोपाडा रसायनी येथील श्री साईबाबा मंदिरात गुरुपौर्णिमा निमित्ताने २९ जुलै रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.याप्रसंगी श्री साईबाबा मंदिरात सकाळी ६ ते ७:३० वाजता भूपाळी, काकड आरती, सकाळी ७:३० ते ९ वाजता एकादश द्रव्य रुद्राभिषेक, दुग्ध अभिषेक, महामंगळ स्नान, प्रसाद वितरण, सकाळी ९ ते ११ वाजता श्री साई महिमा पारायण, दुपारी १२ वाजता मध्यान्ह आरती, सायंकाळी ७:३० ते रात्री ९:३० वाजता संगीत भजनाचा कार्यक्रम आयोजित असून भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री साई बाबा सत्संग केंद्र यांनी केले आहे.

## वसंतराव नाईक महाविद्यालयात वृक्षारोपण

**। कोर्लई । प्रतिनिधी ।**



महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून मुरुडच्या वसंतराव नाईक महाविद्यालयात वासंती उमरोटकर यांच्या अध्यक्षतेखाली वृक्षारोपण कार्यक्रमाचे उत्साहात आयोजन करण्यात आले होते.

यावेळी नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा आराधना दांडेकर, ॲड.इस्माईल घोले, विश्वास चव्हाण, प्राचार्य डॉ.जनार्दन कांबळे, पोलीस निरीक्षक परशुराम कांबळे, डॉ.श्रीशैल भैरगुडे, डॉ. सुभाष म्हात्रे, डॉ.सिमा नाहिद, विजय सुर्वे, नयन कर्णिक, डॉ. गजानन मुनेश्वर, डॉ.नारायण बागुल, प्रा.सिध्देश सतविडकर, प्रा.प्रवेश पाटील, प्रणव बागवे, संदेश दांडेकर आदी उपस्थित होते.

नगराध्यक्षा आराधना दांडेकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की, मुरुड शहराच्या आणि परिसराच्या सुंदरतेत निसर्गाचा मोठा वाटा आहे. अजितदादांच्या जयंतीनिमित्त महाविद्यालयाने हाती घेतलेला हा हरित उपक्रम अत्यंत कौतुकास्पद आहे. शहराला प्रदूषणमुक्त आणि हिरवेगार ठेवण्यासाठी अशा उपक्रमांना नगरपरिषदेचे नेहमीच सहकार्य राहील.

प्रा. चव्हाण यांनी, पर्यावरण संवर्धन ही काळाची गरज असून, अजितदादांचे कार्य आपल्याला सदैव समाजोपयोगी कामे करण्याची प्रेरणा देते,असे मत मांडले. पोलीस निरीक्षक यांनी, शांततेसोबतच निसर्गाचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी असून अशा उपक्रमांमुळे तरुणांमध्ये पर्यावरणाप्रती उत्तरदायित्व निर्माण होते, असे प्रतिपादन केले.

## मोर्बा गावात रात्रंदिवस वीजपुरवठा खंडित

### सामाजिक कार्यकर्ते आंदोलनाच्या पवित्र्यात

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

मोर्बागावातदररोजवीजपुरवठा खंडित होत असल्याने येथील वीज ग्राहकांनी तीव्र संताप व्यक्त केला असून या गावातील सामाजिक कार्यकर्ते तथा वीजग्राहक अकबर बडे व अल्ताफ हर्णेकर यांनी प्रसार माध्यमांजवळ बोलताना नजीकच्याच काळात विज वितरण कार्यालयावर प्रचंड संख्येने मोर्चा काढीत आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे.

या सामाजिक कार्यकर्त्यांनी मोर्बा गावात रात्रंदिवस होणाऱ्या खंडित वीज पुरवठ्यामुळे प्रसार माध्यमांजवळ बोलताना सांगितले कि,बारा दिवसांपूर्वी अशाच प्रकारे मोर्बा गावात दररोज वीजपुरवठा खंडित होत होता. त्यावेळी गावातील ग्रामस्थांनी एकत्रित येत मोर्बा गावातील वीज कार्यालयात धडक देऊन तेथे उपस्थित असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना याबाबत जाब विचारला.

त्यावेळी उपस्थित वीज ग्राहकांनी विज मंडळाच्या कारभारावर नाराजी व्यक्त करीत वीज वितरण कंपनीला इशारा दिला होता. त्यानंतर वृत्तपत्रात व विविध समाज माध्यमांवर या गोष्टी प्रसिद्ध झाल्यावर दोन - तीन दिवस सुरळीतपणे मोर्बा गावात वीजपुरवठा सुरु होता. परंतु पुन्हा एकदा वीज वितरण कंपनीच्या येरे माझ्या मागल्याप्रमाणे काम सुरु आहे. मोर्बा गावात गेली आठ दिवसांपासून रात्रंदिवस पुन्हा वीजपुरवठा खंडित होत आहे. त्यामुळे घरातील इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे नुकसान होत असून रात्री वीजपुरवठा खंडित झाल्याने घरातील आजारी रुग्णांनाही त्याचा त्रास होत आहे. शिवाय विजेवर चालणारी सारी यंत्रणा बंद पडत असल्याने अनेकांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न व्यवसायिकांना सतावत आहे.

याबाबत मोर्बा गावातील विजवितरण कार्यलयावर गेल्यास तेथील अधिकारी व कर्मचारी उडवाउडवीची उत्तरे देऊन वेळ मारून नेतात असे सांगत कोणी ग्राहक वीजचोरी करीत असेल तर त्या ग्राहकावर कारवाई करा पण त्यासाठी गावातील हजारो वीजग्राहकांना वेठीस धरू नका. मोर्बेकरांच्या या वीजप्रश्नाकडे विजवितरण कंपनीने गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन विजपुरवठा सुरळीतपणे सुरु ठेवावा अन्यथा वीजमंडळावर हजारोंच्या संख्येने आंदोलन करण्यात येईल असा इशारा दिला आहे.

## सुनीता कांदळगावकर यांचे मरणोत्तर नेत्रदान

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

नेत्रदान हे अनेकांना दृष्टी देत असतात आणि त्या चळवळीत सहभागी असलेल्या नेरळ येथील सुनीता कांदळगावकर यांचे मरणोत्तर नेत्रदान करण्यात आले. सुनीता कांदळगावकर यांनी आपल्या मृत्यूनंतर नेत्रदान केल्याने त्यांचे या प्रकाश देणारे श्रेष्ठ दान बद्दल कौतुक होत आहे.

नेरळ मधील सामाजिक कार्यकर्ते नितीन कांदळगावकर यांच्या मातोश्री सुनिता कांदळगावकर यांचे निधन झाले. आपल्या मृत्यूनंतर नेत्रदान करण्याचं मोहिमेत त्या सहभागी झाल्या होत्या. दुसऱ्यांच्या आयुष्यात प्रकाश निर्माण करण्याची त्यांची इच्छा त्यांच्या कुटुंबीयांनी पूर्ण केली. त्यांनी जिवंतपणी आपल्या मुलाला स्पष्ट सांगितले होते. त्यानुसार त्यांचे सुपुत्र नितीन कांदळगावकर यांनी आपली आईची इच्छा पूर्ण केली.



सुनीता कांदळगावकर यांचा मृत्यू झाल्यानंतर नवीन पनवेल येथील आर. जे. शंकरा आय हॉस्पिटलच्या आय बँकेशी संपर्क साधला.त्यांची नेत्रदान टीम तत्काळ त्यांच्या निवासस्थानी पोहोचली आणि आवश्यक वैद्यकीय प्रक्रियेनुसार कॉर्नियाचे संकलन करण्यात आले.

## श्रीवर्धन कोमसापची वर्षासहल उत्साहात

**श्रीवर्धन शहर :** कोकण मराठी साहित्य परिषद, श्रीवर्धन शाखेची वर्षा सहल दिवेआगर रोडवरील देवराई कॅम्पिंग येथे संपन्न झाली.सहलीच्या प्रारंभापासूनच सदस्यांचा उत्साह अवर्णनीय होता. सहलीचे ठिकाणही निसर्गाने नटलेल्या जंगलात असल्यामुळे तो द्विगुणित होत होता. तेथे पोहोचल्यावर सदस्यांनी तेथील पाण्याच्या टँकमध्ये पोहण्याचा आनंद मनसोक्त लुटला.

**पोलादपूरमार्गे पश्चिम महाराष्ट्राशी थेट संपर्क | प्रवासाचा वेळ कमी, उद्योग-पर्यटनाला मोठी चालना**

# कोकणच्या विकासासाठी ग्रीनफिल्ड महामार्गाचा प्रस्ताव

**। सलीम शेख ।**
**। माणगाव ।**

कोकणच्या विकासाचा चेहरा मोहरा बदलणारा आणि रायगडसह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रासाठी महत्त्वाचा ठरणारा दिघी बंदर पोलादपूर सुरूर ग्रीनफिल्ड महामार्ग उभारण्याचा प्रस्ताव राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने पुढे आणला आहे. सुमारे १४० किलोमीटर लांबीच्या या नव्या महामार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल आणि व्यवहार्यता अहवाल तयार करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली असून, या प्रकल्पामुळे कोकण आणि पश्चिम महाराष्ट्र यांच्यातील दळणवळणाला ऐतिहासिक गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

हा महामार्ग दिघी बंदर, पोलादपूर आणि सुरूर (राष्ट्रीय महामार्ग क्र. ४८) यांना जोडणार आहे. त्यामुळे कोकणातील बंदरांपर्यंत मालवाहतुकीसाठी जलद आणि पर्यायी मार्ग उपलब्ध होईल. विशेषतः दिघी बंदराच्या विकासाला मोठी चालना



मिळणार असून, औद्योगिक गुंतवणूक, निर्यात, पर्यटन आणि स्थानिक रोजगाराच्या नव्या संधी निर्माण होण्याची शक्यता आहे. मुंबई-गोवा महामार्ग आणि महाबळेश्वर घाटमार्गावरील वाढती वाहतूक, वारंवार होणारी कोंडी आणि अपघात लक्षात घेता हा नवा महामार्ग पर्यायी मार्ग म्हणून महत्त्वाची भूमिका बजावेल. त्यामुळे कोकणातून पुणे, सातारा आणि पश्चिम महाराष्ट्रात जाणाऱ्या प्रवाशांचा वेळ, इंधन आणि वाहतूक खर्च मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे. या प्रकल्पामुळे रायगड जिल्ह्यातील माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, पोलादपूर परिसराच्या विकासालाही नवे दालन खुले होणार आहे. पर्यटनस्थळे, कृषीमाल, मत्स्यव्यवसाय आणि स्थानिक उद्योगांना देशांतर्गत बाजारपेठेशी अधिक वेगवान संपर्क मिळेल. परिणामी ग्रामीण अर्थव्यवस्थेलाही मोठा आधार मिळण्याची शक्यता आहे.

सध्या हा प्रकल्प प्रस्ताव आणि डीपीआर तयार करण्याच्या टप्प्यात असून, त्यानंतर अंतिम मंजुरी, भूसंपादन आणि बांधकामाची प्रक्रिया सुरू होणार आहे. कोकणातील नागरिक, व्यापारी आणि उद्योग क्षेत्राकडून या महत्त्वाकांक्षी महामार्ग प्रकल्पाकडे मोठ्या आशेने पाहिले जात आहे.

# निवडक



## शाळांना शुद्ध पाण्याची सुविधा

**महाड :** महाड तालुक्यात इंडसइंड बँक व अंबुजा फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येत असलेल्या एकात्मिक जलस्त्रोत व्यवस्थापन प्रकल्पाअंतर्गत शिक्षण क्षेत्रात महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत तालुक्यातील ५ जिल्हा परिषद शाळांना ३ किलोवॅट क्षमतेची सौर ऊर्जा प्रणाली तसेच आरओ पाणी शुद्धीकरण यंत्रणा प्रदान करण्यात आली आहे.याच अनुषंगाने जिल्हा परिषद शाळा, किंजळोली खुर्द येथे सौर ऊर्जा प्रणाली व आरओ फिल्टर हस्तांतरणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी किंजळोली खुर्दच्या सरपंच कोमल गौरव भालेकर या उपस्थित होत्या. कार्यक्रमाला अंबुजा फाउंडेशनचे प्रकल्प अधिकारी मुरगुडे, तसेच बेटकर, शाळेचे शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या प्रसंगी मान्यवरांनी मार्गदर्शन करताना सौर ऊर्जा व स्वच्छ पिण्याच्या पाण्याचे महत्त्व अधोरेखित केले. सौर ऊर्जा प्रणालीमुळे शाळेच्या वीजेचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटणार असून विद्यार्थ्यांना अखंड वीजपुरवठा उपलब्ध होणार आहे.



## घनदाट झाडी अपघाताला ठरतेय निमंत्रण

**श्रीवर्धन :** पावसाळी दिवसांत श्रीवर्धन ते बोर्लीपंचतन मार्गावरील घाट रस्त्यावर घनदाट झाडी आता जीवघेणी ठरण्याची भीती व्यक्त होत आहे. पावसाळ्याच्या सुरुवातीलाच रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी उगवलेली घनदाट झाडी आता रस्त्यावर आली आहे. रस्त्याच्या दुतर्फा वाढलेली झाडी वाहनचालकांना त्रासदायक ठरत असून हा मार्ग तीव्र उताराचा आणि अनेक वळणांचा असल्याने पावसाळ्याच्या दिवसात येथे अपघातांची शक्यता निर्माण झाली आहे. दुचाकीस्वार, एसटी बसेस आणि पर्यटकांच्या वाहनांची या मार्गावरून सतत वर्दळ सुरू असते. पावसामुळे रस्ते निसरडे झाले असून, त्यातच जर समोरून येणारे वाहन वेळेत न दिसल्यास भीषण अपघात घडू शकतो. विशेषतः तीव्र उतारावर वाहनाचा ताबा मिळवणे कठीण असते, अशा वेळी ही वाढलेली झाडी अपघातांना थेट निमंत्रण देत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने पावसाळी दिवसांत सातत्याने रस्त्याच्या कडेची झाडी तोडणे आवश्यक आहे.सध्याच्या परिस्थितीत या मार्गावर कधीही दुर्घटना घडू शकते. प्रशासनाने त्वरित कार्यवाही करून प्रवाशांचा प्रवास सुरक्षित करावा, अशी मागणी होत आहे.

## करंजाडीत ५० तुळस रोपांचे वाटप



**महाड :** आषाढी एकादशीच्या पावन औचित्याने रॉयल रायगडकर प्रतिष्ठानच्या वतीने करंजाडी येथील श्री विठ्ठल मंदिरात तुळस वाटप उपक्रम अतिशय उत्साहात पार पडला. सांस्कृतिक परंपरेचे जतन करणे आणि पर्यावरण संवर्धनाचा संदेश देणे, हा या उपक्रमामागील मुख्य उद्देश होता. या प्रसंगी मंदिरात दर्शनासाठी आलेल्या ५० भाविकांना तुळशीच्या रोपट्यांचे वाटप करण्यात आले.या उपक्रमास करंजाडीतील ग्रामस्थ, महिला व वारकऱ्यांचा उत्तम प्रतिसाद लाभला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या सर्व सदस्यांचे आणि मोलाचे सहकार्य करणाऱ्या ग्रामस्थांचे प्रतिष्ठानतर्फे मनःपूर्वक आभार मानण्यात आले. या वेळी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष कर्तव्य जाधव, खजिनदार शुभम पालांडे, तसेच अश्विनी मोरे, श्रुती घाणेकर, ऋषिकेश सविलकर, विनय धाडवे, शुभम गायकवाड, प्रेम सुतार, सुदेश सुतार आणि शिवराज जंगम हे उपस्थित होते.

## किसान हायस्कूल वाळवटीमध्ये वृक्षारोपण



**कापोली :** श्रीवर्धन तालुक्यातील वाळवटीमध्येआषाढी एकादशी निमित्त किसान हायस्कूल येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमाला वाळवटी ग्रामपंचायतीच्या सरपंच नुहा ढांगु, शाळेचे मुख्याध्यापक गरंडे, शिक्षक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व सर्व विद्यार्थी उपस्थित होते. वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे या उक्तीला अनुसरून वृक्षारोपणाचा कार्यक्रम शाळेत आयोजित करण्यात आला.या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या मनात पर्यावरणाबाबत जनजागृती निर्माण करणे तसेच वृक्षांचे महत्व पटवून देणे हा होता.

## रक्तदान शिबिराचे आयोजन

**उरण :** उरणचे उत्तम खेळाडू स्वर्गीय अश्विन पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक बांधिलकी जपत अश्विन पाटील मित्र परिवारच्या माध्यमातून श्री साई ब्लड बँक, पनवेल यांच्या सौजन्याने भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे रक्तदान शिबीर ३० जुलै रोजी सकाळी १०.०० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल, उरण शहर येथे होणार आहे. रक्ताचा आहे थेंब थेंब मौल्यवान, याची असावी सर्वांना जाण; म्हणूनच करावे रक्तदानफ्र या सामाजिक संदेशातून नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन रक्तदान करावे, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे. रक्तदान हे सर्वश्रेष्ठ सामाजिक कार्य असून, आपल्या एका रक्तदानामुळे गरजू रुग्णाचे प्राण वाचण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे या उपक्रमात युवकांसह नागरिकांनी उत्स्फूर्तपणे सहभागी होऊन सामाजिक बांधिलकी जपावी, असे आवाहन करण्यात आले आहे.या सामाजिक उपक्रमाचे आयोजक अश्विन पाटील मित्र परिवार असून, वाढदिवसा निमित्त दरवर्षी विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

श्री.सलीम शेख
ज्येष्ठ पत्रकार माणगाव । मो. क्र. ९४२३३८२७८९

# माणगावकरांचा 'अरुणदादा'

## दीपस्तंभासारखे व्यक्तिमत्त्व, पत्रकारितेतील शान!

**माणगाव शहरातील ज्येष्ठ, अभ्यासू, निर्भीड आणि समाजहिताची जाणीव असलेले पत्रकार म्हणून संपूर्ण रायगड जिल्हा ज्यांना त्यांच्या धारदार, सडेतोड आणि अभ्यासपूर्ण लेखणीमुळे ओळखतो, ते म्हणजे ज्येष्ठ पत्रकार अरुण तुकाराम पवार अर्थात सर्वांच्या प्रेमाचे 'अरुणदादा'. आज, दि. २७ जुलै रोजी त्यांचा वाढदिवस. या निमित्ताने माणगावसह रायगड जिल्ह्यातील असंख्य वाचक, मित्रपरिवार, सहकारी, विद्यार्थी, सामाजिक कार्यकर्ते आणि हितचिंतकांकडून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. अशा या लोकाभिमुख व्यक्तिमत्त्वाला वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!**



स्वर्गीय तुकाराम पवार यांचे अरुणदादा हे ज्येष्ठ सुपुत्र. तुकाराम पवार हे व्यवसायाने शिक्षक. शिक्षण, संस्कार, प्रामाणिकपणा आणि कष्टाची शिकवण त्यांनी आपल्या मुलांमध्ये रुजवली. त्यांच्या मातोश्रींनीही अथक परिश्रम, त्याग आणि मायेच्या छायेखाली संपूर्ण कुटुंब घडविले. आज आई-वडील या जगात नसले तरी त्यांच्या आठवणी अरुणदादांच्या मनात सदैव जिवंत आहेत. त्यांच्या स्मृतींचा उल्लेख झाला की आजही त्यांच्या डोळ्यांत नकळत अश्रू दाटून येतात. ''आई-वडिलांचे संस्कार, त्यांची पुण्याई, भाऊ-बहिणींची साथ, पत्नीचे निःस्वार्थ सहकार्य आणि मुला-मुलींनी शिक्षणाच्या बळावर मिळवलेले यश हेच माझ्या आयुष्याचे खरे बळ आहे,'' असे ते नेहमी कृतज्ञतेने सांगतात. मुलांनी आपल्या कष्टाचे चीज करून उच्च शिक्षणाच्या जोरावर आयुष्यात यशस्वी वाटचाल सुरू केली, ही बाब त्यांच्यासाठी सर्वात मोठे समाधान आहे.

पत्रकारिता, सामाजिक कार्य, शिक्षण आणि क्रीडा या सर्वच क्षेत्रांत अरुणदादांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला आहे. एकेकाळी ते ज्वाली क्रिकेट क्लब, माणगाव संघाचे अष्टपैलू क्रिकेटपटू म्हणून तालुकाभर परिचित होते. उत्कृष्ट क्षेत्ररक्षण, प्रभावी फलंदाजी आणि अचूक ऑफस्पिन गोलंदाजी यामुळे त्यांनी अनेक सामने गाजवले. माणगावचे लोकनेते, माजी आमदार स्वर्गीय अशोकदादा साबळे यांचे अरुणदादांवर विलक्षण प्रेम होते. त्यांनी त्यांना आपल्या मुलाप्रमाणे जपले. अरुणदादांच्या अभ्यासपूर्ण, निर्भीड आणि सडेतोड पत्रकारितेचे दादा साबळे नेहमीच मनापासून कौतुक करत. त्यानंतर सामाजिक, शैक्षणिक आणि विकासकामांच्या प्रवासात त्यांना ॲड. राजीव साबळे यांचेही मोलाचे सहकार्य लाभले. अरुणदादा यांनी माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या माणगाव ज्युनिअर कॉलेजमध्ये प्रयोगशाळा सहाय्यक म्हणून दीर्घकाळ सेवा बजावली. त्या काळात त्यांनी दहावी, अकरावी आणि बारावीच्या विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक मार्गदर्शनच केले नाही, तर जीवनात योग्य दिशा मिळावी यासाठी प्रेरणादायी सल्लाही दिला. आज ते सेवानिवृत्त झाले असले, तरी शिक्षणावरील त्यांचे प्रेम किंचितही कमी झालेले नाही.

त्यांच्या या समर्पणाची दखल घेत माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांनी त्यांची सुधाकर नारायण शिपूरकर प्री-प्रायमरी व गणेश यशवंत वाघेरे इंग्रजी माध्यम शाळेच्या स्कूल कमिटीचे चेअरमन म्हणून नियुक्ती केली. त्यामुळे आजही ते विद्यार्थ्यांच्या घडणीत तितक्याच उत्साहाने योगदान देत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत यशस्वी झाले असून, माणगावला आले की आवर्जून आपल्या गुरूंना भेटण्यासाठी येतात. हीच त्यांच्या कार्याची खरी कमाई आहे.

रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ पत्रकारांमध्ये अरुणदादांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. गेली ४० वर्षांहून अधिक काळ, वयाची ६२ वर्षे पूर्ण झाल्यानंतरही, त्यांनी पत्रकारितेची मशाल तेवती ठेवली आहे. माणगाव तालुक्यासह संपूर्ण रायगडच्या विकासासाठी त्यांनी सातत्याने निर्भीड, अभ्यासपूर्ण आणि लोकहितवादी लिखाण केले. त्यांच्या लेखणीने अनेक प्रश्नांना वाचा फोडली, अन्यायाविरुद्ध आवाज उठविला आणि प्रशासनाला जागे केले. त्यांच्या लेखनामुळे अनेक सर्वसामान्यांना न्याय मिळाला, अनेक प्रश्न मार्गी लागले आणि विकासकामांना गती मिळाली.

पत्रकारितेतील त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून त्यांना १२५ हून अधिक जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील उत्कृष्ट पत्रकार पुरस्कारांनी विविध संस्था, संघटना आणि शासनाने सन्मानित केले आहे. नवोदित साहित्यिकांना व्यासपीठ मिळावे या हेतूने त्यांनी 'फुलोरा' दिवाळी अंक प्रकाशित केला. या अंकालाही जिल्हा आणि राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले.

याशिवाय 'शासन आपल्या दारी' ही लोकप्रिय लेखमालिका त्यांनी दैनिकांतून प्रकाशित करून शासनाच्या विविध योजनांची माहिती अतिशय सोप्या आणि सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत जनतेपर्यंत पोहोचविली. ग्रामीण भागातील हजारो लाभार्थ्यांना या लेखमालिकेचा प्रत्यक्ष लाभ झाला. त्यांचे 'अरुणोदय' हे पुस्तकही प्रकाशित झाले असून, ते वाचकांमध्ये लोकप्रिय ठरले आहे.

त्यांच्या अभ्यासपूर्ण पत्रकारितेची दखल घेत स्वर्गीय लोकनेते अशोकदादा साबळे यांनी त्यांना माणगाव ग्रामपंचायत निवडणुकीत संधी दिली. वॉर्ड क्रमांक ५ मधून ते विक्रमी मतांनी निवडून आले. त्यानंतर पाणीपुरवठा समितीच्या अध्यक्षपदी त्यांची निवड झाली. या पदावर कार्यरत असताना त्यांनी दिवस-रात्र मेहनत घेऊन माणगावकरांना स्वच्छ आणि मुबलक पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी उल्लेखनीय काम केले. आजही अनेक नागरिक त्या कार्याची कृतज्ञतेने आठवण काढतात. पुढील काळात त्यांनी स्वर्गीय अशोकदादा साबळे यांच्या स्मरणार्थ लोकनेते अशोकदादा साबळे ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या., खांदाड या संस्थेची स्थापना केली. या संस्थेचे ते आजही चेअरमन म्हणून कार्यरत असून, संस्था नावारूपाला आली आहे. या माध्यमातून अनेक सुशिक्षित बेरोजगार युवक, लघुउद्योजक आणि सर्वसामान्य नागरिकांना आर्थिक मदत मिळाली असून, अनेकांच्या संसाराला उभारी मिळाली आहे. पत्रकारिता, शिक्षण, समाजकारण, सहकार आणि जनसेवा या सर्व क्षेत्रांत निस्वार्थ भावनेने कार्य करणारे अरुणदादा पवार हे खऱ्या अर्थाने माणगावच्या समाजजीवनातील एक दीपस्तंभ आहेत. त्यांच्या कार्यातून अनेकांना प्रेरणा मिळत आहे आणि पुढील पिढ्यांसाठी त्यांनी आदर्श निर्माण केला आहे.

ईश्वराने त्यांना उत्तम आरोग्य, निरामय आयुष्य, दीर्घायुष्य आणि अशीच अखंड समाजसेवा करण्याची शक्ती द्यावी, हीच वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक प्रार्थना.











































# विद्यार्थ्यांच्या भविष्याचा दीपस्तंभ...



मनिषा मोरे

सुधाकर नारायण शिपूरकर आणि गणेश यशवंत वाघरे विद्यालयाचे चेअरमन म्हणून अध्यक्ष ॲड. राजीव साबळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी केवळ संस्थेची जबाबदारी सांभाळली नाही, तर हजारो विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना आकार देण्याचे, त्यांच्या मनात आत्मविश्वास जागविण्याचे आणि शिक्षणाला संस्कारांची जोड देण्याचे महान कार्य केले आहे. त्यांच्यासाठी प्रत्येक विद्यार्थी हा केवळ शाळेतील क्रमांक नसून, उद्याचा जबाबदार नागरिक, कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व आणि देशाचा भावी आधारस्तंभ आहे.

शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या कार्याइतकीच त्यांची पत्रकारिताही समाजाभिमुख आहे. एक निर्भीड, अभ्यासू आणि संवेदनशील पत्रकार म्हणून त्यांनी समाजातील सकारात्मक कार्याला नेहमीच व्यासपीठ दिले. विशेषतः विद्यार्थ्यांनी शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, विज्ञान, कला किंवा सामाजिक क्षेत्रात मिळविलेल्या यशाला त्यांनी वृत्तपत्रातून प्रसिद्धी देऊन त्यांच्या कर्तृत्वाचा सन्मान केला. अनेक विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील पहिली बातमी, पहिला फोटो आणि पहिला गौरव त्यांच्या लेखणीतून समाजापर्यंत पोहोचला. त्या एका बातमीने कित्येक विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत नवीन स्वप्ने जागी झाली, तर पालकांच्या चेहऱ्यावर अभिमानाचे अश्रू उमटले.

अरुण दादा यांचा ठाम विश्वास आहे की, गुणपत्रिकेतील गुण माणसाचे भविष्य ठरवत नाहीत; तर त्याचे संस्कार, आत्मविश्वास आणि जिद्द त्याला उंच शिखरावर पोहोचवतात. म्हणूनच त्यांनी शाळेत शिस्त, संस्कार, चारित्र्य, सामाजिक जाणीव आणि मानवी मूल्यांची पेरणी केली. त्यांनी विद्यार्थ्यांना केवळ अभ्यास शिकविला नाही, तर आयुष्य जगण्याची दिशा दिली.

आजच्या स्पर्धात्मक युगात ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी कोणत्याही क्षेत्रात मागे राहू नये, ही त्यांची प्रामाणिक तळमळ आहे. डॉ. होमी भाभा बालवैज्ञानिक परीक्षा, प्रज्ञाशोध परीक्षा, मंथन ऑलिम्पियाड आणि विविध स्पर्धा परीक्षांसाठी त्यांनी विद्यार्थ्यांना सातत्याने मार्गदर्शन केले. स्वतः प्रात्यक्षिक परीक्षा घेतल्या, प्रत्येक विद्यार्थ्याच्या क्षमतेचा शोध घेतला, त्यांच्या अडचणी समजून घेतल्या आणि यशापर्यंत पोहोचण्यासाठी त्यांना खंबीर आधार दिला. त्यांच्या प्रेरणेने अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवून शाळेचा, पालकांचा आणि तालुक्याचा गौरव वाढविला.

विशेषतः इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी अतिरिक्त वर्ग, सकाळी लवकर अभ्यास सत्र, सराव परीक्षा, वैयक्तिक समुपदेशन आणि सातत्यपूर्ण मार्गदर्शनाची प्रभावी व्यवस्था उभारली. प्रत्येक विद्यार्थ्याला यश मिळावे, हीच त्यांची धडपड असते. एखादा विद्यार्थी अडचणीत असेल, तर त्याच्या पाठीशी उभे राहणे ही त्यांची स्वाभाविक वृत्ती आहे.

त्यांनी केवळ विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर पालक आणि शिक्षकांनाही एकत्र आणून शिक्षणाची सशक्त त्रिसूत्री उभी केली. त्यांच्या नेतृत्वाखाली शिस्त, गुणवत्ता आणि संस्कार यांचा सुंदर संगम घडला. परिणामी शाळेवरील पालकांचा विश्वास अधिक दृढ झाला आणि दरवर्षी विद्यार्थीसंख्या सातत्याने वाढत गेली.

सीबीएसई इंग्रजी माध्यमाची शाळा सुरू होत असताना त्यांनी शेकडो पालकांच्या घरी जाऊन आधुनिक शिक्षणाचे महत्त्व समजावून सांगितले. त्यांचा संवाद हा केवळ प्रवेशासाठी नव्हता; तो प्रत्येक मुलाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा प्रामाणिक प्रयत्न होता.

तसेच गीता दत्तात्रय तटकरे नर्सिंग कॉलेज सुरू होताना त्यांनी तालुक्यातील विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांना नर्सिंग क्षेत्रातील संधींची माहिती दिली. सुमारे सहाशे विद्यार्थ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांनी अनेकांच्या करिअरला नवी दिशा दिली. त्यांच्या या प्रयत्नांमुळे अनेक कुटुंबांच्या आशांना नवे पंख मिळाले.

अरुण (दादा) पवार यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे शिक्षण, पत्रकारिता आणि समाजसेवा यांचा त्रिवेणी संगम आहे. विद्यार्थ्यांच्या यशात आनंद मानणारे, त्यांच्या अपयशात धीर देणारे, पालकांच्या अपेक्षा समजून घेणारे आणि शिक्षकांना प्रेरणा देणारे असे व्यक्तिमत्त्व विरळाच असते. त्यांनी हजारो विद्यार्थ्यांच्या मनात केवळ चेअरमन म्हणून नव्हे, तर मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि प्रेमळ 'दादा' म्हणून स्थान मिळवले आहे.

त्यांच्या कार्याचा खरा गौरव पुरस्कारांत नाही, तर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटणाऱ्या आत्मविश्वासपूर्ण हास्यात आहे; पालकांच्या डोळ्यांत दाटून येणाऱ्या समाधानाच्या अश्रूंमध्ये आहे; आणि समाजाच्या मनात निर्माण झालेल्या विश्वासात आहे.

अशा दूरदृष्टीच्या, कर्तव्यदक्ष, विद्यार्थीप्रिय, संवेदनशील आणि समाजाभिमुख व्यक्तिमत्त्वाला वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक शुभेच्छा!

ईश्वर त्यांना उत्तम आरोग्य, निरोगी दीर्घायुष्य आणि समाजसेवेची अखंड प्रेरणा देवो. त्यांच्या कार्याचा प्रकाश असाच हजारो विद्यार्थ्यांच्या आयुष्याला उजळत राहो, त्यांच्या स्वप्नांना बळ देत राहो आणि शिक्षण, संस्कार व मानवतेचा हा दीप भविष्यातही तितक्याच तेजाने प्रज्वलित राहो, हीच मनःपूर्वक प्रार्थना.

**– मुख्याध्यापिका**
**सुधाकर नारायण शिपूरकर विद्यालय व गणेश यशवंत वाघरे इंग्रजी स्कूल, माणगाव रायगड**

# शिखरदेव डोंगर ट्रेकिंगसाठी सज्ज; सुविधांची प्रतीक्षा!

**मान्सूनच्या आगमनाने महाडचा निसर्गरम्य 'शिखरदेव' बहरला!**

**पर्यटनाचा नवा केंद्रबिंदू: महाडचा 'शिखरदेव' डोंगर!**

**'शिखरदेवाला' इको-टुरिझमचा दर्जा द्या; स्थानिकांची मागणी!**

**। महाड । प्रतिनिधी।**

महाड शहरापासून अवघ्या १२ किलोमीटर अंतरावर, सह्याद्रीच्या पर्वतरांगांमध्ये आणि सावित्री नदीच्या निसर्गरम्य खाडीपट्ट्यात शिखरदेव हे विहंगम ठिकाण वसलेले आहे. सव, चोचिंदे, मुठवली, सापे, वामने, भवानी नडगाव, रावढळ आणि आंबिवली या ग्रामीण परिसराच्या वेशीवर असणाऱ्या या शिखरावरून सभोवतालचा संपूर्ण खाडीपट्टा, हिरवीगार भातशेती आणि सह्याद्रीच्या डोंगररांगांचे ३६० अंशांतून नयनरम्य दृश्य दिसते. चोचिंदे ते आंबिवली दरम्यानच्या गावांतील स्थानिक ग्रामस्थ, शेतकरी आणि भाविक दैनंदिन कामासाठी, पर्यटनासाठी व दर्शनासाठी येथे सातत्याने येत-जात असतात.

शिखरदेव हे केवळ एक ट्रेकिंग स्पॉट नसून परिसरातील ग्रामस्थांचे आणि शेतकऱ्यांचे मुख्य श्रद्धास्थान आहे. आषाढी एकादशीच्या शुभमुहूर्तावर परंपरेनुसार आजूबाजूच्या गावांमधून भाविक दर्शनासाठी एकत्र येतात. देवाला नारळ अर्पण करण्याची पिढ्यानपिढ्या चालत आलेली प्रथा आजही श्रद्धेने जपली जात आहे.

येथे जून ते ऑक्टोबर हा काळ ट्रेकिंगसाठी सर्वात आल्हाददायक मानला जातो. महाड शहरातून वीर-सव मार्गे रस्त्याने या ठिकाणी सहजरीत्या पोहोचता येते. डोंगरमाथा गाठण्यासाठी साधारण दोन ते अडीच तासांची पायपीट करावी लागत असल्याने, तसेच वर पिण्याच्या पाण्याची आणि खाद्यपदार्थांची सोय नसल्याने पर्यटकांनी स्वतः सोबत पुरेसे पाणी, अल्पोपहार आणि प्रथमोपचार साहित्य ठेवणे आवश्यक आहे. निसर्गाचे सौंदर्य अबाधित राखण्यासाठी परिसरात कचरा न टाकता तो सोबत परत आणावा, असे आवाहनही स्थानिक ट्रेकर्सकडून केले जात आहे.



> **निसर्गाच्या सानिध्यात येताच सर्व ताणतणाव नाहीसे होतात. भगवा ध्वज हाती घेऊन डोंगर चढणे, येथील हिरवळ, झरे आणि मैदानात विविध खेळ खेळत भिजण्याचा आनंद काही वेगळाच असतो. सध्या झाडीत वसलेल्या या ठिकाणी भविष्यात सुंदर मंदिर निर्माण होणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासोबतच पाणी, वीज आणि मूलभूत सुविधा मिळाल्यास शिखरदेव नक्कीच एक उत्तम पर्यटन स्थळ आणि लोकप्रिय ट्रेकिंग पॉईंट म्हणून नावारूपास येईल.**
> **सचिन रसाळ, सापे (स्थानिक पर्यटक व ट्रेकर)**

> **निसर्गाने शिखरदेवाला अफाट सौंदर्य दिले आहे, मात्र पायाभूत सोयी-सुविधांअभावी पर्यटकांना व भाविकांना मोठी कसरत करावी लागते. देवाला नारळ अर्पण करण्याची परंपरा जपत असतानाच, या ठिकाणी मंदिर निर्माण होणे गरजेचे आहे. डोंगरावर चढण्यासाठी सुकर पायवाट, पिण्याचे पाणी आणि निवाऱ्याची तातडीने सोय व्हावी. शासनाने या परिसराला इको-टुरिझमचा दर्जा देऊन विकास केला, तर निसर्गाचे जतन होईलच, शिवाय स्थानिक तरुणांच्या हाताला रोजगाराच्या नव्या संधी मिळतील.**
> **स्थानिक ग्रामस्थ व निसर्गप्रेमी**

अफाट निसर्गसौंदर्य लाभलेले हे पर्यटन स्थळ आज अनेक पायाभूत सुविधांच्या प्रतीक्षेत आहे. भाविक आणि पर्यटकांची सातत्याने होणारी ये-जा पाहता डोंगरावर चढण्यासाठी सुकर व पक्क्या पायवाटेची तातडीने गरज आहे. तसेच माथ्यावर निवाऱ्याची व्यवस्था, पिण्याचे पाणी, विजेची सोय, अल्पोपहार आणि कचरा व्यवस्थापनासाठी कचराकुंड्यांची सोय करणे गरजेचे आहे.

शासनाने व पर्यटन विभागाने या स्थळाची दखल घेऊन याला ग्रामीण व इको-टुरिझमचा दर्जा दिला, तर परिसरातील सापे, सव, वामने, भवानी नडगाव, मुठवली, रावढळ, चोचिंदे व आंबिवली आदी गावांतील तरुणांना मार्गदर्शक (गाइड), हॉटेल व्यावसायिक व वाहतूकदार म्हणून स्थानिक पातळीवरच रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील.

# सायन-पनवेल महामार्गावर पडल्या फांद्या



**। खांदा कॉलनी । प्रतिनिधी।**

मुसळधार पावसासह जोरदार वाऱ्यामुळे सायनपनवेल महामार्गावरील खांदा कॉलनी येथील नेत्रज्योत रुग्णालयासमोरील फूटपाथलगत लावलेले एक झाड कोसळले असून त्याच्या मोठ्या फांद्या अनेक दिवसांपासून रस्त्याच्या कडेला पडून आहेत. मात्र, संबंधित प्रशासनाने अद्याप त्या हटविलेल्या नसल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना त्रास सहन करावा लागत आहे.

मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या या वर्दळीच्या महामार्गावर दिवसभर मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरू असते. रस्त्यालगत पडलेल्या फांद्यांमुळे वाहनांना मार्ग काढताना अडचणी निर्माण होत असून अपघाताचा धोका वाढला आहे. विशेषतः दुचाकीस्वारांना अधिक काळजी घ्यावी लागत आहे.

याच ठिकाणी बसथांबा असल्याने प्रवाशांनाही गैरसोयीचा सामना करावा लागत आहे. झाडाच्या फांद्यांमुळे बस सहज दिसत नसल्याची तक्रार प्रवाशांनी केली आहे. त्यामुळे बस पकडण्यासाठी नागरिकांना रस्त्यावर पुढे येऊन उभे राहावे लागत असून कोणत्याही क्षणी गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# रानवली ग्रामपंचायतीचे विभागस्तरीय मूल्यमापन संपन्न

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत रायगड जिल्ह्यात द्वितीयक्रमांकपटकवूननेत्रदीपकयश मिळवणाऱ्या श्रीवर्धन तालुक्यातील रानवली ग्रामपंचायतीचे विभाग स्तरीय मूल्यमापन नुकतेच अत्यंत उत्साहात पार पडले.



या मूल्यमापन प्रक्रियेदरम्यान तपासणी समितीने अभियानातील सर्व आठ मुख्य घटकांची बारकाईने पाहणी केली. ग्रामपंचायतीचे दप्तर, प्रत्यक्ष झालेली विकासकामे, स्वच्छता मोहीम, प्रशासकीय पारदर्शकता आणि विविध लोककल्याणकारी योजनांची तळागाळातील अंमलबजावणी या सर्व बाबींचा समितीने कसून आढावा घेतला.

या विशेष तपासणीसाठी अमरावती विभागातून वरिष्ठ अधिकाऱ्यांचे पथक रानवली येथे दाखल झाले होते. यामध्ये अप्पर आयुक्त, अमरावती विभाग शालिनी कडू, सहाय्यक आयुक्त राजीव फडके, विस्तार अधिकारी किशोर पांडे आणि ताडे या अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत कार्यालयातील कागदपत्रांची तपासणी करण्यासोबतच प्रत्यक्ष गावात जाऊन विकासकामांची पाहणी केली. या प्रसंगी रायगड जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी विशाल तनपुरे आणि श्रीवर्धन गटविकास अधिकारी राजू किरवे यांच्यासह सरपंच सुरेश मांडवकर, उपसरपंच आताउल्ला जालगावकर, ग्रामविकास अधिकारी अभिजीत माने आणि मुख्याध्यापक भिकू पांगारकर उपस्थित होते.

# बाबा अमरनाथ बर्फानी संघर्ष यात्रा

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

अखिल आर्यवत संघ आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या वतीने आयोजित करण्यात आलेली बाबा अमरनाथ बर्फानी संघर्ष यात्रा मुंबईतील वांद्रे टर्मिनस येथून शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत उत्साहात रवाना झाली. यात्रेचा शुभारंभ संस्थापक व राष्ट्रीय अध्यक्ष दिनेश पाटील यांच्या हस्ते करण्यात आला.

यावेळी भगवे ध्वज, भगवे फेटे, देशभक्तीपर गीते आणि हर हर महादेव, जय श्रीराम यांच्या जयघोषाने संपूर्ण वांद्रे टर्मिनस परिसर भक्तिमय आणि उत्साहपूर्ण वातावरणाने दुमदुमून गेला. यात्रेसाठी महाराष्ट्रातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी दिनेश पाटील म्हणाले, बाबा अमरनाथ यात्रा ही केवळ धार्मिक यात्रा नसून सनातन संस्कृती, श्रद्धा आणि राष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक आहे. सर्व कार्यकर्त्यांनी शिस्त, संयम आणि राष्ट्रभक्तीची भावना जपत ही यात्रा पूर्ण करावी, असे आवाहन केले आहे.

## जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्री. इम्रान रहीम सुनेसारा यांच्याकडून पुढील विवरणीत अर्थात गट/सर्व्हे क्र.२५३/१,२५४/१, २५७, २६०/१, २७३, २७४, २८१, २८८,२८९ व २९५ धारक विविध जमिनींचे सर्व ते भाग व भूखंड, गाव कावीर, तालुका अलीबाग, जिल्हा रायगड (सदर मालमत्ता) या जागेसंदर्भातील खालील अनुसूचीमध्ये विस्तृतपणे विवरणीत मूळ हक्क शृंखला दस्तावेज (सदर दस्तावेज) हरवले/गहाळ झाले आहेत.

यासंदर्भात दि. २१ जुलै, २०२६ रोजी ओशिवरा पोलीस स्टेशन येथे पोलीस तक्रार दाखल करण्यात आली आहे व ती अनुक्रमांक ९९८०४-२०२६ व ९९८०९-२०२६ अंतर्गत गहाळ रजिस्टरमध्ये नोंद करण्यात आली आहे.

कोणाही व्यक्तीस सदर दस्तावेज सापडल्यास अशा व्यक्तींनी कृपया सदर दस्तावेजांच्या मूळ प्रती खालील विहित पत्यावर सादर कराव्यात. पुढे, कोणाही व्यक्तीचा सदर दस्तावेज व/वा सदर मालमत्तेसंदर्भात कोणताही दावा व/वा कोणताही हक्क, अधिकार वा हितसंबंध असल्यास त्यांनी त्यासंदर्भात लिखित स्वरूपात त्यासंदर्भातील कागदोपत्री पुराव्याच्या प्रमाणित सत्यापित प्रतींसमवेत सदर सूचनेच्या प्रसिद्धी दिनांकापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत लिखित स्वरूपात सूचित करावे.

**अनुसूची**
**गहाळ मूळ दस्तावेजांची सूची**

१. विक्री करार एएलबी/३०४९/२०१०, दि.०४.०८.२०१०
२. विक्री करार एएलबी/४५६९/२०१०, दि.०३.१२.२०१०
३. विक्री करार एएलबी/४४८६/२०१२, दि.२१.१२.२०१२
४. विक्री करार मधुकर भगत व इस्माइल रेहमान झारी, दि. ०३.१२.१९९६
५. विक्री करार एएलबी/४६०२/२०१०, दि.०६.१२.२०१०
६. विक्री करार एएलबी/१८३८/२०१०, दि.१२.०५.२०१०
७. विक्री करार एएलबी/४५६८/२०१०, दि.०३.१२.२०१०
८. विक्री करार एएलबी/३३२/२०११, दि २१.०१.२०११
९. विक्री करार एएलबी/२०५८/२०११, दि.०६.०५.२०११
१०. विक्री करार ९९/१९९४, दि.२१.११.१९९४
११. विक्री करार संतोष गुंजाळ व निर्मला तुळपुळे, दि. २१.१२.१९९९
१२. विक्री करार एएलबी/३०५७/२००७, दि.१९.०६.२००७
१३. विक्री करार एएलबी/१३७५/२००७
१४. विक्री करार एएलबी/३०५३/२००७, दि.१९.०६.२००७
१५. विक्री करार एएलबी/४०६६/२०१०, दि.२८.१०.२०१०
१६. विक्री करार एएलबी/१२९६/२०१२, दि.२०.१२.२०१२
१७. विक्री करार एएलबी/४८०९/२००८, दि.१४.०७.२००८
१८. विक्री करार एएलबी/८३३/२०१०, दि. ०२.१२.२०१०
१९. विक्री करार एएलबी/६७७/२०११, दि. ११.०२.२०११
२०. विक्री करार मानकर व अन्य आणि तुकाराम होळे व संजय गांधी, दि. १८.०७.२००८.

दिनांक : २७ जुलै, २०२६

**प्राइमो लीगल**
**वकील व सॉलिसिटर्स**
ए-१००५, समर्थ ऐश्वर्या, ऑफ न्यू लिंक रोड, हाय लँड पार्कच्या समोर, ओशिवरा, अंधेरी (प.), मुंबई - ४०० ०५३,
ई-मेल : info@primolegal.in
कृपया प्राइमो लीगल की प्रिमो लीगल याबद्दल कन्फर्म करावे.

## जाहीर सुचना

सर्व लोकांना या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की आमचे अशिल यांनी खालील वर्णनाची मिळकत तिचे मालक श्री. विनायक यशवंत सानप सौ. तृप्ती विनायक सानप, तनिष्क विनायक सानप अ.पा. क श्री. विनायक यशवंत सानप, चैतन्य विनायक सानप अ.पा.क श्री विनायक यशवंत सानप यांच्याकडुन कायमचे खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**शेतजमिन मिळकतीचे वर्णन**
**मौजे वंजारवाडी, ता कर्जत जि रायगड येथील मिळकत**

वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं ५/४/अ एकुण ०.४१.०० गुंठे जागा पैकी लिहुन देणार याचे ०.२०.५० गुठ्ठे क्षेत्र विकत घेणार आहेत. तरी शेतजमीन मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, गहाणखात, दान, भाडेपट्टा, लीज अथवा इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हित संबंध असल्यास आणि त्यांची आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारात हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखीपुराव्यासह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मिळकतीशी कोणतीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसलेही प्रकारचा हक्कहितसंबंध त्यानी आमचे अशीलाच्या लाभात सोडुन दिलेला असुन त्यांनी आमचे अशीलाच्या खरेदीच्या व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशील खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील मागाहुन कोणतीही तकार विचारात घेतली जाणार नाही.
येणेप्रमाणे जाहीर सुचना आहे.

दिनाक २७/०७/२०२६

**ॲड. देविदास यशवंत देवघरे**
पत्ता. मु.पो कडाव ता कर्जत रायगड
भ्रमणध्वनी ९०२८५९२७९८

## तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसीलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र. अर्ज ८०/२०२६

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्री. धर्मा तुकाराम धाडकी, — अर्जदार
रा.मु.खामदे, पो. सावली,
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यू विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत सावली — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदार यांची आई कै. बाळू बाई तुकाराम धारकी यांचा मृत्यू दि. १५-०६-१९९५ रोजी राहत्या घरी मौजे खामदे, ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड येथे झाला आहे. त्यांच्या मृत्यूची नोंद ग्रुप ग्रामपंचायत सावली, कार्यालय यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे मृत्यू नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, कै.बाळू बाई तुकाराम धारकी, यांचा मृत्यू दि. १५-०६-१९९५ रोजी मृत्यू झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत:किंवा वकीलामार्फत मे. न्यायालयात दि. १८-०८-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २३-०७-२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

**सही/-**
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

## जाहीर नोटीस

सर्व संबंधित व्यक्ती, संस्था आणि हितधारकांस सूचित करण्यात येते की, मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खाली नमूद केलेल्या जमिनीचे आमचे अशिलाने खरेदी करण्याचे ठरवले आहे. तरी, खाली नमूद करण्यात आलेल्या जमिनीबाबत जर कोणत्याही व्यक्ती, संस्था, ट्रस्ट, सहकारी संस्था, कुळधारक, खरेदीदार, मुद्रक, गहाणदार, तारणदार, भाडेकरू किंवा इतर कोणालाही कोणत्याही प्रकरचा हक्क, स्वत्व, दावा, अडचण, अडथळा किंवा कोणतेही कायदेशीर संबंध असल्यास, तश्या व्यक्तींनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांच्या आत योग्य त्या लेखी पुराव्यासह आपल्या हरकती खालील पत्यावर सादर कराव्यात.

जर दिलेल्या मुदतीत कोणतीही हरकत प्राप्त झाली नाही, तर सदर जमीन निर्वीघ्न आणि निर्विवाद आहे असे मानले जाईल आणि आमचे आशिल त्यानुसार खरेदी व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही हरकती आमच्या आशिलांवर कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक राहणार नाहीत.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड**

| अ.क्र | भूमापन क्र. | क्षेत्र (हे. आर.) | आकार (रु.पै.) | भोगवटाधारकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १) | ८८ | ०-६३-००+ ०-०४-०(पो.ख.) = ०-६७-०० | १३.५६ | नीना काशीनाथ घुमकर, मालती काशीनाथ घुमकर राजीव काशीनाथ घुमकर संजीव काशीनाथ घुमकर |
| २) | ८६/१/अ | ०-१५-९० (यामधील नीना काशीनाथ घुमकर मालती काशीनाथ घुमकर, राजीव काशीनाथ घुमकर, संजीव काशीनाथ घुमकर, उमा उदय वेंगुर्लेकर, या भोगवटाधारकांचा असलेला अविभक्त हिस्सा) | ४.१३ | उमा उदय वेंगुर्लेकर, क्षमा पांडुरंग घुमकर, सुषमा पांडुरंग घुमकर, मानसी प्रसन्न रेडकर |

अलिबाग
दि. २६/०७/२०२६

सही/-
**ॲड. सचिन पाटील**
पत्ता - आनंदी प्राइट बिल्डींग, बी विंग, रूम न. ३०२, तिसरा मजला, जुनी भाजी मार्केट, अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड
मो.- ९८२३१२६९२७

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे उमरोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमीन मिळकत तिचे मालक श्री. गणेश तुकाराम जाधव यांजकडून कायमची खरेदी करण्याचे ठरविले आहे :-

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्रफळ (हे.आर.) | आकार (रू.पै.) |
|---|---|---|---|
| ६० | ३ | ०-१२-४० | ०=२८ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा साठेकरार, ताबा कब्जा, कुळवहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, फरोक्त चार्ज लिज, अटॅचमेंट, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास आणि त्याची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी तसे आम्हांस ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांत लेखी पुराव्यासह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर कळवावे. वरील मुदतीत कोणीही हरकत न घेतल्यास वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध नाही. असे समजण्यात येवून आमचे अशिल वरील मिळकतीच्या खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

दिनांक : २६/०७/२०२६

**ॲड. महेश मोतीराम घारे**
मु. सांगवी, ता. कर्जत, जि. रायगड
मो. ९८८१८५८६५४,९२७१८६९२०२

## तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय
**(तहसीलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता. मुरुड जि. रायगड)**

ज.म.र. अर्ज ७९/२०२६

**जाहीर नोटीस**

प्रति,
श्री. नुरुद्दीन शे. दाऊद हलडे
रा.२२२ अ, पाल मोहल्ला विहूर — अर्जदार
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड

विरुद्ध

निबंधक, जन्म मृत्यू विवाह नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत विहूर, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि. रायगड

सदर या जाहीर नोटीसीद्वारे सर्व लोकांस कळविण्यांत येते की, उपरोक्त अर्जदार यांचा जन्म दि. २३-०९-१९४४ रोजी मौजे विहूर, ता. मुरुड, जि. रायगड येथे राहत्या घरात झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत विहूर, यांचे जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणे करीता मुरुड न्यायालयात रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १० अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, अर्जदार यांचा दि. २३-०९-१९४४ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वत: किंवा वकीलामार्फत मे.न्यायालयात दिनांक १२-०७-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकती न आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदार यांनी जन्म-मृत्यू नोंद रजिस्टरमध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २३-०७-२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

**सही/-**
**(आदेश डफळ)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

**वाचकांसाठी निवेदन**

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

**ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन**

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी-सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**







# वेणगाव जिल्हा परिषद शाळेला नवीन रुपडे

। नेरळ । प्रतिनिधी।

कर्जत तालुक्यातील मोठे वेणगाव येथील जिल्हा परिषद शाळेची मोठी दुरवस्था झाली होती. त्यामुळे जिल्हा नियोजन मंडळाने या शाळेच्या इमारतीच्या कामासाठी ३० लाखाचा निधी मंजूर केला. आता या शाळेचे दुरुस्तीचे काम पूर्ण झाले असून, नव्याने सजलेल्या या शाळेच्या इमारतीचे उद्घाटन आमदार महेंद्र थोरवे यांचे हस्ते करण्यात आले.



वेणगाव येथील जिल्हा परिषद शाळेच्या इमारतीची दुरवस्था झाली होती. या इमारतीचे काम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांची गैरसोय टाळण्यासाठी इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. आम दार महेंद्र थोरवे यांचे हस्ते या इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी उपजिल्हाप्रमुख भाई गायकर, गटशिक्षण अधिकारी अनंत खैरे, केंद्रप्रमुख कराळे, मुख्याध्यापिका मालती नोरकर, गणेश पालकर, गणेश मुंढे, उपसरपंच दिनेश गायकवाड, ग्रामपंचायत सदस्य अभिषेक गायकर, मोनिका पालकर, उत्तम सोनवणे, सुभाष गवले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आमदार महेंद्र थोरवे यांनी, शाळा ही राष्ट्र घडविण्याची कार्यशाळा असते. त्यामुळे शिक्षणावर केलेली गुंतवणूक ही देशाच्या भविष्यावर केलेली गुंतवणूक आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित व दर्जेदार शैक्षणिक वातावरण मिळावे, या उद्देशाने जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून ३० लाख रुपयांचा निधी उपलब्ध करून शाळेच्या दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे. मतदारसंघातील प्रत्येक जिल्हा परिषद शाळा आधुनिक व गुणवत्तापूर्ण करण्यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील करण्याचा निर्णय आपण घेतला असल्याचे आमदार थोरवे यांनी जाहीर केले. आपल्या तालुक्याला हेवा वाटेल असे उत्तुंग यश विद्यार्थ्यांनी मिळवावे, असे आवाहन देखील आमदार थोरवे यांनी द्यविद्यार्थ्यांना केले.




## अजातशत्रू व्यक्तिमत्त्व, बहुजन समाजाचे

# ज्येष्ठ नेते अस्लमभाई राऊत

श्री.सलीम शेख

आपल्याकडे कोणत्याही समाजाचा व्यक्ती काम घेऊन आला तर त्याचे काम होण्यासाठी पाठपुरावा करून जातीने लक्ष घालणारे, गोरगरीब सर्व सामान्य जनतेची कामे झाली पाहिजेत हा उद्देश नजरेसमोर ठेऊन बहुजन समाजात काम करणारे अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणजेच माणगाव तालुक्यातील मोर्बा गावचे सुपुत्र तथा राजिपचे माजी कृषी सभापती व विद्यमान जिल्हा परिषद सदस्य अस्लमभाई राऊत. त्यांचा आज दि.२७ जुलै रोजी वाढदिवस असून, सुरुवातीलाच त्यांना तमाम मोर्बेकरांसह माणगाव तालुका वासियांतर्फे वाढदिवसाच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा ....!

अस्लम राऊत यांचे राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात विशेष असे काम आहे. रायगड जिल्ह्यातील ज्येष्ठ व्यक्तिमत्वांपैकी अस्लमभाई हे एक ओळखले जातात. गेल्या अनेक वर्षांपासून ते राजकीय, सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य कुशलतेने काम करीत आहेत. राजकारण करीत असताना ८० टक्के समाजकरण व २० टक्के राजकरण करीत त्यांनी समाजोपयोगी कामे आपल्या आयुष्यात केली आहेत. त्यांनी मोर्बा ग्रामपंचायतीचे सरपंच म्हणूनही उत्तम पद्धतीने काम केले आहे. शेकापमध्ये असताना पक्षाचे ज्येष्ठ नेते तथा माजी जिल्हा परिषद अध्यक्ष स्व.प्रभाकर पाटील यांच्या समवेतही काम करण्याची अस्लमभाईंना संधी मिळाली. सुरवातीच्या काळात रायगड जिल्हा परिषदेचे सदस्य झाल्यावर अस्लमभाईंना जिल्हा परिषदेचे कृषी सभापती म्हणून काम करण्याची संधी मिळाली. त्याकाळात अस्लमभाईंनी आपल्या मोर्बा जिल्हा परिषद गटातील शेतकऱ्यांसह जिल्ह्यातील शेतकरी बांधवांना कृषी सभापती म्हणून वेगवेगळ्या योजनांचा परिपूर्ण लाभ मिळवून दिला. त्यांनी माणगाव तालुक्यात चांगल्या प्रकारे बांधणी केली होती. त्यानंतर अस्लमभाईंनी लोकांची कामे झाली पाहिजेत, याकरिता सत्तेच्या प्रवाहामध्ये आपण सामील झालो तर आपला विकास कामांचा तसेच सर्व सामान्यांचे प्रश्न सोडविण्याचा असलेला मानस पूर्ण होऊ शकेल



हा उद्देश त्यांनी नजरेसमोर ठेऊन रायगड-रत्नागिरी लोकसभा मतदार संघाचे खासदार सुनील तटकरे, राज्याच्या महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे व विधानपरिषदेचे आमदार अनिकेत तटकरे या तटकरे कुटुंबियांच्या विकासकामांना प्रेरित होऊन अस्लमभाईंनी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्याहस्ते व उपस्थितीत मोर्बा येथील कार्यक्रमात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. त्यानंतर होऊ घातलेल्या सन २०२६ च्या जिल्हा परिषद निवडणुकीत अस्लमभाईंना मोर्बा जिल्हा परिषद गटातून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे उमेदवारी देण्यात आली. या निवडणुकीत अस्लम राऊत हे दणदणीत मतांनी जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आले. अस्लमभाईंच्या विजयाने मोर्बा गावासह विभागातील असंख्य नागरिकांनी व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या कार्यकर्त्यांनी आनंदाचा एकच जल्लोष साजरा केला. अस्लम राऊत हे आता रायगड जिल्हा परिषदेतील एक अनुभवी सदस्य म्हणून ओळखले जात आहेत. जनतेची कामे झाली पाहिजेत यासाठी अस्लमभाई नेहमीच प्रयत्नशील असतात. आपल्या मोर्बा येथील कार्यालयात कोणी काम घेऊन आल्यास त्याचे काम होण्यासाठी अस्लमभाई पराकोटीचे प्रयत्न करतात. मुस्लिम समाजाचे नेते म्हणून संपूर्ण मुस्लिम समाज त्यांचा नेहमीच आदर करीत असतो. समाज बांधवांच्या न्याय हक्कासाठी अस्लमभाई नेहमीच पुढे असतात. ते मोर्बा सोशल सोसायटी संस्थेवर गेली अनेक वर्षांपासून सेक्रेटरी म्हणून काम पाहत आहेत. आपल्या भागातील गोरगरीब जनतेच्या मुला-मुलींना चांगले दर्जेदार शिक्षण मिळावे व त्यातून पुढे हि मुले चांगल्या ठिकाणी सेवेत रुजू व्हावे यासाठी शैक्षणिक क्षेत्रात काम करताना त्यांनी विद्यार्थ्यांचे हित पहिले आहे. गोरगरीब सर्व सामान्य जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यात अस्लमभाई नेहमीच पुढे असतात. त्यांचे कार्य बहुजन समाजात वाखण्याजोगे आहे. म्हणूनच नुकत्याच झालेल्या जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत अस्लमभाई गरीब जनतेच्या आशीर्वादाने भरघोस मतांनी निवडून आले. ते सर्वांच्या सुखदुःखात समरस होत असतात. अस्लमभाईंची सर्वांसाठी काम करण्याची असणारी तळमळ व सर्वांशी असणारे सलोख्याचे संबंध यामुळेच त्यांनी माणगाव तालुक्यात बहुजन समाजाचे नेते म्हणून नावलौकिक मिळविला आहे. अस्लमभाईचे हे सामाजिक कार्य असेच पुढे सुरु राहावे यासाठी ईशवराने त्यांना दीर्घायुष्य देवो हीच ईश्वर व अल्लाह चरणी मनःपूर्वक प्रार्थना ......!


































कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)